नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

श्री
विदर्भ साहित्य संघ
विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:

ऑगस्ट १९५४
किंमत आठ आणे

संपादक
पु. य. देशपांडे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून लायब्ऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष ९ वें] ऑगस्ट १९५४ [अंक ५ वा

श्री. माडखोलकर दप्तरी ग्रंथालय विदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

संपादक–मंडळ

ग. त्र्यं. माडखोलकर
के. ज. पुरोहित
पां. ब. गाडगीळ
सौ. कुसुमावती देशपांडे
गो. रा. दोडके
ना. रा. शेंडे

या अंकांत

सांस्कृतिक आघाडीवर सामसूम —संपादकीय
सुश्लोक गोविंद —प्रा. भ. श्री. पंडित
कै. भालचंद्र लोवलेकर —शरच्चंद्र मुक्तिबोध
सासुरवाशिण —बाबा मोहोड
फ्रेंच साहित्यकार आन्द्रे मॉल्‌रॉ

कविता— वसंत निनावे, रमेश वाबगांवकर, निशिकांत करकरे, उ. रा. गिरी.

परीक्षणें— गो. रा. दोडके, केशव केळकर.

याशिवाय, संघवार्ता.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

या अंकांतील लेखक

प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित– विदर्भ साहित्य संघाचे पूर्वाध्यक्ष. सुप्रसिद्ध कवि आणि टीकाकार यांचा 'आधुनिक मराठी कविता' हा ग्रंथ प्रसिद्धच आहे. त्यांचे 'पिचलेला पावा' 'चवथीचा चांद' 'उन्मेष आणि उद्रेक' आणि 'सुवास आणि रस' हे कविता-संग्रह वाचकांच्या परिचयाचे आहेत.

शरच्चंद्र माधव मुक्तिबोध– सुविख्यात नवकवि. 'नवी मळवाट' हा त्यांचा काव्य संग्रह आणि 'क्षिप्रा' ही कादंबरी सुप्रसिद्ध आहे, 'प्रगतिशील साहित्य' हा त्यांचा टीका लेखांचा संग्रह प्रकाशनांच्या वाटेवर आहे. मराठीप्रमाणें हिंदी भाषेवरहि त्यांचें प्रभुत्व आहे.

वसंत निनावे– जूनच्या अंकांत परिचय पहावा.

निशिकांत करकरे– ग्वाल्हेरचे तरुण कवि. यांच्या कविता 'युगवाणी' महाराष्ट्र–साहित्य पत्रिका या मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

रमेश वाबगांवकर– नागपूरचे उदयोन्मुख कवि. यांच्या कविता 'युगवाणी', 'मनोहर' इत्यादि मासिकांतून प्रसिद्ध होत असतात.

उ. रा. गिरी– विदर्भांतील तरुण कवि. यांच्या कविता महाराष्ट्रांतील सर्वच प्रमुख नियतकालिकांत प्रसिद्ध होत असतात.

★
★★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

युगवाणी वर्ष ९ वें ऑगस्ट १९५४ अंक ५ वा

संपादकीय

सांस्कृतिक आघाडीवर सामसूम

येत्या ऑगस्ट १५ ला भारतीय स्वातंत्र्याचीं सात वर्षें पूर्ण होऊन आपलें हें स्वातंत्र्योत्तर युग आठव्या वर्षांत पदार्पण करीत आहे. स्वातंत्र्यप्राप्ती-साठी भारतीय जनतेने केलेला संग्राम अपूर्व मानला गेला आहे. त्याची अपूर्वता दोन गोष्टींत साठली होती : (१) पुरातन भारतीय जीवनमूल्यांना देण्यांत आलेला नवा उजळा आणि (२) साध्य-साधन संगतीचा नवा आविष्कार.

भारतीय स्वातंत्र्याला अपूर्वता प्राप्त करून देणाऱ्या या दोन गोष्टींच्या निकषावर आपल्या या नवोदित स्वातंत्र्य-युगाचें गेल्या सात वर्षांचें विहंगमाव-लोकन करतां आपल्याला काय दिसून येतें ?

आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रांत गेल्या सात वर्षांच्या अवधींत बऱ्याच घडामोडी झाल्या. त्याचें विश्लेषण करण्याचें हें स्थळ नव्हे. परंतु या घडामोडींचा भारताच्या सांस्कृतिक जीवनावर जो प्रभाव पडत आहे व त्यामुळे साहित्य व कला यांच्या निर्मितीला जें वळण लागत आहे त्याची दखल घेणें प्रत्येक साहित्य-कार, कलाकार व टीकाकार यांचें कर्तव्य आहे, असें आम्ही मानतों.

साहित्य व कला हा सांस्कृतिक जीवनाचा केवळ बाह्य साज नसून संस्कृतीला विशिष्ट रंग-रूप-आकार देण्याचें, मूलभूत महत्त्वाचें कार्य सर्जनशील कला करीत असते. एवढेंच नव्हे, तर समाजांतील बहुतांश व्यक्तींची मानसिक घडण धर्म, तत्वज्ञान, साहित्य व कला यांनी केलेल्या संस्कारांमुळेच घडविली जाते. सामाजिक जीवनाला प्राणभूत असलेल्या या चारहि गोष्टींना आमच्या या नव्या स्वातंत्र्योत्तर युगांत कोणती अवस्था प्राप्त झाली आहे, याचा शोध घेणें अत्यावश्यक आहे.

पाश्चात्यांचा दाखला

हा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास आपल्यास काय आढळून येतें ? राजकीय स्वातंत्र्यामुळे भारतीय म्हणजेच हिंदु धर्माच्या उज्ज्वल परंपरेला कसलाहि उजळा मिळाल्याचें दिसून येत नाही. उलट, आपल्या नव्या प्रजासत्ताक राज्यघटनेने 'सेक्युलॅरिझम्'चें जें एक अ-व्याख्येय तत्त्व अंगीकारलें आहे त्यामुळे हिंदु-व्यतिरिक्त इतर धर्मांना संरक्षण व प्रोत्साहन मिळणें आणि हिंदु धर्माचा कोंडमारा होणें, असाच प्रकार घडून आला आहे. सांस्कृतिक दृष्टया ही घटना किती भयावह आहे याची यत्किंचित्हि कल्पना आमच्या राजकीय नेत्यांना व समाजधुरीणांना आहे, असें दिसून येत नाही. पाश्चात्य राष्ट्रांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनांत ख्रिस्ती धर्माच्या संस्कारांचा केवढा मोठा प्रभाव आहे याची जाणीव या देशांतील विचारवंतांत मुळींच दिसून येत नाही. रेनेसन्स व आधुनिक विज्ञान यांच्या प्रभावामुळे फार मोठें परि-वर्तन जरी घडून आलेलें असलें तरी येशू ख्रिस्त व

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बायबल यांनी घडविलेल्या धर्मभावनेच्या संस्कारांचें पाश्चात्यांच्या मानसकोषांतून मुळीच उच्चाटन घडून आलेलें नाही. उलट, जुनी धर्मभावना आणि आधुनिक विज्ञान यांचें एक नवें एकजीवीकरण पाश्चात्य देशांत घडून आल्याचें स्पष्ट दिसून येतें.

सारांश, धर्मभावना ही मानवी मनांत इतकी खोल रुजून बसली आहे की, तिच्या भक्कम अधिष्ठानाशिवाय सामाजिक परिवर्तन व प्रगति यांची भाषा बोलणें म्हणजे मातीशिवाय घट घडविण्याची भाषा बोलण्यासारखेंच आहे.

धर्मभावनेचें सांस्कृतिक महत्त्व बहुतांश आधुनिक विचारवंतांनी व वैज्ञानिकांनीदेखील मान्य केलेलें आहे. पण आमच्या या दुर्दैवी देशांत, आणि सामान्यतः समग्र आशिया खंडांत, पाश्चात्यांच्या सर्वंकष आक्रमणामुळे आमच्या धर्मभावनेची जी दुर्दशा घडून आली आहे ती आमच्या सांस्कृतिक जीवनाला नख लावणारी आहे. वैदिक व बौद्ध धर्म यांच्या हजारो वर्षांच्या प्रभावामुळे भारतीयांचेच नव्हे, तर बहुतांश आशियावासियांचे मानसकोष सखोलपणें संस्कारित झालेले आहेत. शिवाय हे दोन्ही धर्मप्रकार मुळांत भारतीय असल्यामुळे आणि त्यांचें तात्त्विक अधिष्ठान एकरूप व अति भक्कम असल्यामुळे या अधिष्ठानाच्या अभावावर भारत व आशियायी राष्ट्रें यांची सांस्कृतिक प्रगति घडवून आणण्याची भाषा बोलणें हास्यास्पद आहे.

सांस्कृतिक मूल्यांची दुर्दशा

आमच्या या नवोदित स्वातंत्र्ययुगाचा एक भयानक विशेष हा आहे की, आमच्या कोणत्याहि राष्ट्रीय योजनांना आमच्या पारंपरिक धर्मभावनेचें अधिष्ठान यत्किंचित्हि प्रमाणांत लाभलेलें नाही. उलट, सेक्युलॅरिझमच्या विनबुडाच्या धोरणामुळे धार्मिक भावनेला आमच्या पुनरुत्थानाच्या महान् कार्याच्या जवळपास देखील फिरकूं न देण्याची दक्षता आमचे राजकीय नेते कटाक्षाने घेत आहेत. याचा परिणाम असा होत आहे की, आमच्या राष्ट्रीय जीवनांतून आमच्या सर्व सांस्कृतिक मूल्यांची हकालपट्टी होत असल्याचें भयानक दृश्य आम्हास दिसूं लागलें आहे. नागडा स्वार्थ, अमानुष स्पर्धा, सत्ता व संपत्ति यांचा निर्बुद्ध व नैतिकताशून्य हव्यास यांचें भेसुर तांडव देशभर सुरू झालें आहे. सुजनता, सुसंस्कृतता व सांस्कृतिक जीवनमूल्यांवरील श्रद्धा यांची झपाट्याने हकालपट्टी होत आहे. आणि लांगूलचालन, नकली गुण, उथळपणा, निर्नैतिक स्पर्धा, निलाजरी प्रसिद्धि आणि भोंदूपणाचे सर्व प्रकार यांना भलता भाव चढूं लागला आहे. आमच्या राष्ट्रीय योजना कितीहि काळजीपूर्वक तयार करण्यांत येत असल्या व त्यांना अंशतः सफलता प्राप्त होत असल्याचें दृश्य दिसत असलें तरी सांस्कृतिक मूल्यांच्या भक्कम अधिष्ठानाच्या अभावीं या सर्व योजनांची भव्य इमारत भुसभुशीत वाळूवर उभारण्यात येत असल्यामुळे ती केव्हां व कशी कोलमडून पडेल याचा नेम नाही.

काळोखी भवितव्य

ही परिस्थिति साहित्य व कला यांच्या पुनरुत्थानाला व विकासाला अत्यंत प्रतिकूल अशी आहे. भारतीय साहित्य व कला यांचा इतिहास पाहतां आमचें भव्य शिल्प, आमची अतुलनीय मूर्तिकला, आधुनिक चित्रकलेलाहि चारदोन धडे शिकवूं शकणारी आमची चित्रकला, मानवी संसाराचें अनेकविध व भव्योदात्त चित्र रंगविणारीं रामायण–महाभारतादि महाकाव्यें, आधुनिक विज्ञानानेंहि ज्याच्या अधिष्ठानाला यत्किंचित्हि हादरा दिला नाही असें वैश्विक तत्त्वज्ञान आणि अनेकविध साहित्य–कला प्रवृत्तींना व प्रकारांना उत्स्फूर्त करणारें आमचें सांस्कृतिक जीवन यांचा उद्गम व विकास वैदिक व बौद्ध तत्त्वज्ञानानें व धर्मभावनेने जितका पोसला गेला आहे तितका तो इतर कोणत्याहि आंतरिक व बाह्य शक्तींनी प्रभावित झालेला नाही. इतकी वैभवशील सांस्कृतिक परंपरा भूतलावरील कोणत्याहि देशाला लाभलेली नाही.

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आम्हां आधुनिक भारतीयांना या परंपरेचा केवळ पुसट स्पर्श झालेला आहे. आमचें वैचारिक जीवन पाश्चात्य प्रवाहांनीच बहुतांश पोसलें गेलें आहे. आणि पाश्चात्य देशांत सांप्रत जी वैचारिक कोंडी निर्माण झाली आहे तिच्यामुळे आमचे वैचारिक आविष्कार संपुष्टांत आलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व कालांतील आमचा बौद्धिक विलास आणि सांप्रतची बौद्धिक आघाडीवरील भेसुर सामसूम पाहतां आम्हाला बौद्धिक व सांस्कृतिक भवितव्य उरलें आहे किंवा नाही याची चिंता वाटूं लागते.

कोणत्याहि वैचारिक व कलात्मक क्षेत्रांत आज कसलीहि आशादायक खळवळ दिसून येत नाही. कोणत्याहि क्षेत्रांत वैचारिक संघर्षाचे स्फुल्लिंग उफाळून वर आलेले दिसून येत नाहीत. भवितव्याच्या कसल्याहि प्रकारच्या स्वप्नांत आमची प्रतिभा रंगलेली दिसून येत नाही. परंपरेचा उरलासुरला पोकळ अभिमान देखील विपरीत जागतिक परिस्थितीच्या दाहक वणव्यांत जळून खाक होत आहे. कसेबसें जीवन कंठणारे द्विपादपशू, यापरता दुसरें कसलेंहि महत्त्व आम्हा भारतीयांना उरलेलें नाही.

वैचारिक आंदोलनाची आवश्यकता

या भयानक परिस्थितीची यथार्थ व सखोल जाणीव करून घेण्याची वेळ आता आलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व युगांत स्वातंत्र्याकांक्षेमुळे व स्वातंत्र्याच्या जीवनमूल्यांमुळे आमच्या सामाजिक जीवनाला उदात्ततेच्या ओढीची एक बाजू लाभली होती. या आधुनिक स्वातंत्र्याकांक्षेशी आमचीं पारंपरिक सांस्कृतिक जीवनमूल्यें निगडित होऊं लागलीं होतीं आणि यामुळेंच आमच्या स्वातंत्र्यसंग्रामाला एकप्रकारची अपूर्वता प्राप्त झालेली होती.

पण आज आपण काय पाहतों? आज, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या या काळांत स्वातंत्र्याचें जीवनमूल्यच जणूं नष्ट झाल्यासारखें दिसून येत आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ति, असें समीकरण केलें गेल्याचें विदारक दृश्य आज जिकडे तिकडे दिसून येत आहे. प्रजासत्ताक राज्यघटना आम्ही मान्य केलेली आहे; परंतु या राज्यघटनेला अधिष्ठानभूत असलेल्या स्वातंत्र्य–मूल्याचा आम्हाला विसर पडलेला आहे. सर्व कांही कोठून तरी वरून आल्याशिवाय आमच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाचें पान हलेनासें झालें आहे. परावलंबन व परधार्जिणेपणा व तज्जन्य अधम प्रवृत्ति आमच्या मानसपिंडांत घर करू लागल्या आहेत. स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक परंपरा यांची ताटातूट घडून आल्यामुळे आमच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाचें नैतिक व प्रातिभ अधिष्ठान ढासळूं लागलें आहे.

नव्या वैचारिक आन्दोलनाखेरीज ही भयानक परिस्थिति सावरली जाणें शक्य दिसत नाही. पण हें नवें वैचारिक आन्दोलन कसें निर्माण होणार? आमच्या मतें भारतीय वैचारिक परंपरेच्या सर्व अंगोपांगांचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करणें व जिव्हाळ्याचा परिचय करून घेणें आणि भारतीय सांस्कृतिक परंपरेंतील सर्व चैतन्यमय प्रेरणा आत्मसात् करून आधुनिक परिस्थितीवर मात करूं शकणारी एक नवी भव्योदात्त आकांक्षा जनमनांत निर्माण करणें, अशा दुहेरी भूमिकेच्या आधारावरच हें नवें वैचारिक आन्दोलन निर्माण केलें जाणें संभवनीय आहे.

परंपरा, परिवर्तन व प्रगति यांचे अन्योन्य संबंध कसे आहेत, याच्या सूक्ष्म व सखोल अभ्यासांतूनच नवीं वैचारिक आन्दोलनें निर्माण होत असतात, असें इतिहासावरून सहज सिद्ध करतां येण्यासारखें आहे. केवळ परंपरा व परंपरेचा पोकळ अभिमान याने काम भागणें शक्य नाही. तसेंच केवळ परिवर्तन व प्रगति यांचे शाब्दिक ढोल बडवीत बसण्यानेंहि कार्यभाग होण्यासारखा नाही. परंपरा, परिवर्तन व प्रगति यांचे अन्योन्य संबंध आणि त्यांची परस्परावलंबी प्रक्रिया यांचें यथार्थ ज्ञान करून घेण्याच्या जिव्हाळ्याच्या व भावनोत्कट प्रयत्नांतूनच वैचारिक आन्दोलन उस्फूर्त होत असतें. असें वैचारिक आन्दोलन निर्माण करण्याची आवश्यकता आमच्या विचारवंतांना, साहित्यिकांना व कलावंतांना पटावी एवढ्याच हेतूनें हे त्रोटक विचार आम्ही सादर केले आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

‘ सुश्लोक गोविन्द* ’

★——————— लेखक : प्रा. भ. श्री. पंडित ———————★

संस्कृत साहित्यांतील सुप्रसिद्ध गीतिकाव्य रचयिता श्री जयदेव यांच्या गीतगोविंदाचा हा मराठी अनुवाद आहे. ११ वें शतक हा जयदेवाचा आविर्भावकाल मानतात. मात्र त्याची चरित्रविषयक माहिती फारशी उपलब्ध नाही. आणि जी थोडीफार माहिती ज्ञात आहे तिचा जनश्रुति हाच आधार आहे. त्याच आधारावर नामाजींनी आपल्या ‘ भक्तमालें’त आणि प्रियादासांनीं तिच्यावरील आपल्या ‘ भक्तिरस बोधिनी ’ टीकेंत कांही माहिती ग्रथित केली आहे. याच दोन हिन्दी ग्रंथांचा आधार घेऊन महिपतींनीं आपल्या ‘ भक्तविजयां ’त जयदेवाचें आख्यान रंगविलें आहे. परंतु हे दोन हिंदी ग्रंथ आणि महिपतींचा ‘ भक्तविजय ’यांतील साधनसामग्री कशी त्रुटित व काल्पनिक आहे याविषयीं मी मागे एकदां आक्टोबर १९४२ च्या महाराष्ट्रसाहित्यपत्रिकेंत विस्तारानें लिहिलें होतें तेव्हां त्याचा पुनरुच्चार येथें करीत नाही.

जयदेवांचा जन्म बंगाल मधील वीरभूमि या भागांतील किंदुबिल्व या गावीं झाला होता. त्यांच्या पित्याचें नांव भोजदेव आणि मातेचें नांव रामादेवी किंवा राधादेवी होते, बंगालचा अधिपति राजा लक्ष्मणसेन यांच्या राजसभेंत त्यांचा आदरसत्कार झाला होता. ई. स. ११७० हा लक्ष्मणसेनाचा आविर्भाव काल आहे. तेव्हां तोच जयदेवांचा आविर्भावकाल होय असें Brahminism and Hinduism या ग्रंथाचे कर्ते मॉनियर विलियम्स् हे म्हणतात (पृ. १४६) Sikh Religion या ग्रंथाचे कर्ते एम. ए. मॅकॉलिफ यांचे मत असेंच आहे. तेव्हां ११ व्या शतकापेक्षां १२ वें शतक हा जयदेवांचा आविर्भावकाल मानणें अधिक युक्तिसंगत दिसते. Out line of the Religions Literature of India या ग्रंथाचे कर्ते जे. एन. फर्कुहार हे जयदेवास सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ निंवार्क याच्या शिष्यशाखेंतील मानतात. निंबार्काचार्य हे राधाकृष्णाचे उपासक आणि द्वैताद्वैत मताचे प्रचारक होते. त्यांच्या मतानुसार ब्रह्म आणि जीव यांत भेद आहे. तरीहि जीवाचें अस्तित्व ब्रह्मांत विलीन होत असते. अशा रीतीनें त्याची स्वतंत्र सत्ता उरत नाही. ब्रह्म आणि जीव यांचें हें अंतिम ऐक्य साधण्यासाठीं भक्ति हेंच साधन आहे. तिच्या प्राप्त्यर्थ राधा आणि कृष्ण यांची उपासना आवश्यक आहे. जयदेवांच्या गीतिकाव्यांत तीच उपासना दृष्टीस पडते.

जयदेवांच्या ‘ गीतगोविंदां ’त राधा आणि कृष्ण यांच्या ललितलीला, मधुरमीलन आणि प्रेमपूर्ति यांचें सरससुंदर संगीत आहे. संस्कृत साहित्यशास्त्रांतील सोळा श्रृंगार, निरनिराळया नायिकांचे भेद आणि नखशिखवर्णन यांपैकीं कांही रीतींचा समावेश अथवा सन्निवेश त्यांत झाला आहे. भिन्नभिन्न भारतीय भाषांतील भक्तिपर साहित्यांत राधेला जें अतिशय हृदयंगम व्यक्तित्त्व प्राप्त झालें आहे त्याचा प्रारंभ ‘ गीतगोविंदा ’ पासून झाला. ‘ गीत गोविंदा ’चें वैशिष्ट्य त्याच्या कोमलकांत पदावलींत आहे. जयदेवांनीं त्या पदावलीला निरनिराळया रसानुकूल रागरागिणींची जोड देऊन अधिक सरस केलें आहे. ‘ गीतगोविंदा ’ची भाषा जितकी मधुर तितकीच तिच्या मागील भावशक्ति प्रभावी आहे. तिनें अंतःकरणांतील सूक्ष्मातिसूक्ष्म भाव प्रदर्शित करून आपलें कौशल्य आणि सामर्थ्य रसिकांच्या निदर्शनास आणलें आहे.

वास्तविक विचार केला, तर ‘गीतगोविंदां’तील श्रृंगाराच्या वेगवेगळया छटा या लौकिकच आहेत. परंतु प्रारंभापासूनच निंबार्क आणि चैतन्य यांनीं आपआपल्या भक्तिसंप्रदायांत त्यांना मान आणि महत्त्व दिल्यामुळें अध्यात्माच्या क्षेत्रांत त्या संकेतस्वरूप झाल्या आहेत. ‘गीतगोविंदां’तील अतिरेकी श्रृंगारा-

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संबंधीं कै. विष्णुशास्त्री चिपळुणकरांनी 'संस्कृत कविपंचकां'त एक आख्यायिका दिली आहे. तिचा आशय असा कीं, पदावलि आळवून जयदेव कृष्णाची आराधना करीत असतांना ते एकदम प्रकट झाले आणि त्यांनी जयदेवाच्या मुखावर हात ठेवला. कारण श्रृंगारातिरेकामुळें ते स्वतःच विचलित व अधीर झाले होते. सारांश हाच कीं गीतगोविंद हें काव्य आध्यात्मिकतेपेक्षां श्रृंगारिकतेकडेच अधिक झुकलेलें आहे. या श्रृंगारातिशयतेचें उत्तरदायित्व कदाचित् त्या कालाकडे असावें. कारण बौद्धमताचा ऱ्हास आणि सनातन मताचें पुनरुज्जीवन यांच्या मधल्या काळांत हळुहळू इस्लामचीं आक्रमणें होण्यास आरंभ झाला. त्यांना सहिष्णुतेनें प्रतिबंध करण्यासाठीं भक्तिमताचा उदय झाला. त्यांत उदासीन विरक्तीपेक्षां प्रेममय प्रवृत्तीचें प्राबल्य विशेष होते. चैतन्यांच्या भक्तिमतांत 'माधुर्या'ला म्हणजे दांपत्यभावाला विशेष महत्व आहे. कारण प्रवृत्तीला पवित्र स्वरूप देण्याचा हा भक्तिवाद्यांचा प्रयत्न होता. जगन्नाथाच्या मंदिरावर श्रृंगारिक प्रतिमा आहेत. या सर्वांवरून असाच निष्कर्ष निघतो कीं, 'लौकिक प्रवृत्ती'ला 'आध्यात्मिक भक्ती'त रूपांतरित करण्याचा तो काळ होता.

'गीतगोविंदा'ला संस्कृत साहित्यांतील एकमेव गीतिकाव्य म्हणून तर महत्व आहेच; परंतु भारत देशाच्या इतिहासांत भक्तीच्या आंदोलनाचा प्रसार करणारें एक प्रभावी साधन म्हणून विशेष महत्व आहे. 'गीतगोविंद' हें पहिलें भक्तिकाव्य होय. म्हणूनच नामाजींनी आपल्या 'भक्तमालें'त आणि शीखांचे पांचवे गुरु अर्जुनदेव यांनी आपल्या 'श्री ग्रंथसाहेबां'त जयदेवांना आख्यान दिलें आहे. मैथिल कविकोकिल विद्यापति आणि सूरदास, नंददास, मीरा आदि हिंदी कवींवर जयदेवांच्या 'गीतगोविंदा'चा विलक्षण प्रभाव होता. या सर्वांनी कृष्णाचीच आराधना केली असून 'राध' म्हणजे 'सेवा करणें व प्रसन्न करणें' या अर्थानें राधेची स्तुति केली आहे. जयदेवांप्रमाणेंच या सर्वांनी गीतिकाव्यें रचलीं असून त्यांच्या शेवटीं स्वतःचीं नांवें गोंविलीं आहेत. विद्यापतींना तर 'अभिनव जयदेव' अशी उपाधि होती. जयदेव आणि विद्यापति यांचीं गीतें ऐकतां ऐकतां चैतन्य भावविवश होऊन मूर्च्छित होत असें म्हणतात. भक्तप्रवर कवीरांनीहि आपल्या पूर्वी होऊन गेलेल्या जयदेवांचा 'गुर प्रसादी जैदेउ नामा भगति के प्रेमि इनही है जाना' या शब्दांत गौरव केला आहे. तात्पर्य, 'गीतगोविंदा'ला ज्याप्रमाणें एक काव्य म्हणून त्याप्रमाणेंच भक्तिपर ग्रंथ म्हणून महत्त्व आहे.

मराठी संतकवींवर किंवा कथाकवींवर 'गीतगोविंदा'चा प्रभाव आठवत नाही. नाही म्हणावयास शिवकालीन कवि तुका ब्रम्हानंद यांच्या नांवावर एक समश्लोकी अलिकडे उपलब्ध झाली आहे. पण ती यथातथाच आहे. महीपतीच्या 'भक्तविजयां'त जयदेवाचें आख्यान सुरुवातीलाच येण्याचें कारण त्याला आधारभूत जो 'भक्तमाला' हा हिंदी ग्रंथ, त्यांतहि तें सुरुवातीलाच आलें आहे. मोरोपंतांनीं 'गीत गोविंद' वाचलें होतें हें 'केकावली तील' प्रियाकुचतटीं जिहीं न वहुवार पत्रावली' ही कल्पना म्हणजे 'कुरु यदुनंदन चंदन शिशिरतरेणकरेण पयोधरे' या पदावलीचें स्फुरण आहे यावरून सहज लक्षांत येईल. अलिकडे वसंतविहार, अनंततनय इत्यादिकांनीं 'गीतगोविंदा'ते मराठी अनुवाद केले आहेत. पण ते विशेष सुंदर व सरस नाहींत. मराठींत 'गीतगोविंदा'च्या सर्वोत्कृष्ठ रूपांतराची आवश्यकता होती. डॉ. श्रीखंडे यांच्या प्रस्तुत प्रयत्नानें ती पूर्ण झाली आहे या बद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. *

'गीतगोविंदा'ला मराठी संतांनीं विशेष मानले नाही याचें कारण महाराष्ट्रांत 'भक्तिमतां'तील 'माधुर्या'पेक्षां 'वात्सल्या'ला म्हणजे स्नेहभावाला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रीयकवींनीं जीवाशिवाच्या नात्याला पतिपत्निसंबंधाप्रमाणें न लेखतां अपत्य व माता यांमधील संबंधाप्रमाणें मानलें आहे हें विशेष आहे. 'गीतगोविंदा'ला महत्त्व नसलें तरी त्याची महाराष्ट्रांत चहा मात्र होती. वर ओघाओघांत कै. वि. कृ. चिपळुणकरांपर्यंत' गीतगोविंदाचें झालेले उल्लेख निर्दिष्ट केलेच आहेत. कै. हरिभाऊ आपटयांनी 'वज्राघात' या आपल्या सुप्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरीच्या पहिल्या प्रकरणांतच 'निभृत निकुंजग्रहे गतया निशि' आणि 'निंदति चन्दनमिंदु किरणमनु' या दोन अष्टपद्यांचा अंतर्भाव करून आपल्या रसिकतेचा परिचय दिला आहे. मे १९१८ च्या 'मनोरंजनांत 'त प. वा. रे. टिळक यांनी बालकवींचा जो मृत्युलेख लिहिला आहे त्यांत बालकवींच्या भाषेची स्तुति करतांना 'मधुरकोमलकांत

मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पदावलिं । श्रुणुत वालकवेश्च सरस्वतीं।। असा जयदेवाच्या वाणीचाच अनुकार केला आहे. 'ललित लताकुंजी चल सखये !' आणि 'आठवती ते दिन अजुनी' या तांब्यांच्या दोन कविता जयदेवाच्या अनुकरणानेंच स्फुरल्या आहेत. त्यांच्या एका कवितेचें पालुपद 'मान मानिनी ! मान न करि गे !' हें 'साकुरु मानिनि मानमये' या अष्टपदीवरुन उत्स्फूर्त झालें आहे हे काय निराळे सांगावयास हवें ?

डॉ. श्रीखंडे यांच्या प्रस्तुत अनुवादांत श्लोक आहेत. पण गीतें नाहीत. त्यांनी मुळीं आपल्या अनुवादाला 'सुश्लोक गोविंद' असेंच नांव दिलें आहे. 'सुश्लोक' म्हणजे 'कीर्तिमान्' हा दुसरा एक अर्थ त्यांत अभिप्रेत आहे. या अनुवादांत गीतांच्या जागीं श्लोक आहेत म्हणून माधुरींत ते कमी आहेत असें मात्र नाही. उलट 'अधरिं मधुर पांवा माधवें वाजवावा' हा मालिनी वृत्तांतला श्लोक किंवा 'ऋतु वसंत सुखावह हे निशा' हा द्रुतविलंबित वृत्तांतला श्लोक रागदारींत ज्या प्रमाणें आलापतां येतो त्याचप्रमाणें गोड गळयावर वाचतां येतो. श्लोकवद्धरचनेंत गायन आणि वाचन या दोन्ही गोष्टी साध्य झाल्या आहेत हें अनुवादांत कांही ठिकाणीं नादानुकूल वृत्तयोजना झाल्यामुळें शद्बांमागील भाव आणि अर्थ यांचें प्रकटीकरण सहज सुलभ झाले आहे. राधेची सखि तिला कृष्णाकडे जाण्याची त्वरा करीत आहे त्यावेळच्या या कांही पदपंक्ति पहा 'पंचचामरा' मुळें त्यांत ताल व नाद यांचा आविर्भाव झाला आहे :–

'मुकुंद वल्लरीगृहीं असे तरंगिणी तटीं ।
तिथेंच जा प्रियाकडे ! मिळो हरीसि गोरटी !
विरोध सोड अंगने ! मतंगमंदगामिनी ।
क्षणांत टाक सर्वसा विलंव हा नितंविनी !

प्रस्तुत अनुवादांत क्वचित् मूळांतील सुंदर अर्थाची अभिव्यक्ति यथोचित झालेली नाही. उदाहरणार्थ, 'कुरु यदुनन्दन चन्दन शिशिर तरेण करेण पयोधरे मृगमदपत्रकमत्र मनोभवमंगलकलश सहोदरे ।। या अष्टपदींत 'पयोधरां'वर 'मदनाच्या मंगल कलशांचा' आणि 'सहोदरां'चा आरोप करण्यांत आला आहे. 'कलश' आणि 'सहोदर' या शद्बांनी ज्या प्रतिमा अंत:श्चक्षूंपुढें उभ्या राहतात त्यांचा अनुभव –

'हे नाथ ! शीतल करें मज सौख्य द्यावें, ।
कस्तूरिनें मम पयोधर रंगवावे
जो पंचवाण रतिकांत अनंगराया, ।
हे हेमकुंभ जणुं मंगल त्या कराया ।

या अनुवादांत येत नाही. शिवाय 'आनंदाचा कंद हरि हा देवकि नंदन पाहिला हा' या चालीवर ही अष्टपदी गातांना जो गोडवा प्रत्ययास येतो तो या अनुवादांत नाही. ज्या ठिकाणीं अनुवाद समश्लोकी आहे तेथेंहि क्वचित् मूळांतील यथार्थ शद्ब आलेले नाहीत. उदाहरणार्थ, 'मधुरकोमल कान्त पदावलिं'

श्रुणु तदा जयदेवसरस्वतीम्' या चरणांचा
'मधुर कोमल ही पदपद्धती
परिसरे ! जयदेवसरस्वती ।' हा अनुवाद
'मधुर कोमलकान्त पदावली
परिस श्रीजयदेव गिरा भली' असा असता,

तर मूळांत 'पदावलि' हा जो कोमल शद्ब आहे तो कायम राहून 'मधुर' 'कोमल' आणि 'कान्त' हीं त्याचीं विशेषणें तशींच राहिलीं असतीं. यथार्थतेच्या दृष्टीनें तें आवश्यक होतें.

अनुवाद करण्याचें कार्य अतिशय कठिण असतांना डॉ. श्रीखंडे यांनी तें मोठ्या मेहेनतीनें व जवाबदारीनें पार पाडलें आहे यावद्दल त्यांचें जेवढें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. त्यांचा व्यवसाय रुक्ष वैद्यकीचा, परंतु साहित्याच्या क्षेत्रांत कार्य करून त्यांनी आपली रसज्ञता व मर्मज्ञता प्रकट केली आहे. रसिकांनी हा त्यांचा अनुवाद अवश्य वाचावा.*

---

* सुधारून वाढविलेली आवृति. किंमत चार रुपये. प्रकाशक– डॉ. रा. चिं. श्रीखंडे, मंगळवार पेठ, कोल्हापूर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

क वि ता

उमर खय्याम

" Here with a loaf of bread beneath
the bough,
A flask of wine, a book of verse-
and thou—"

तृप्त मिटून पापण्या
शांत पडलों इथे मी
एका झाडाच्या बुंध्याशी—
ज्याच्या कोवळया पानांचें
मुग्ध हिरवें मानस
रचितसें कधी काळीं
रम्य बालिश स्वप्नांचे
किनखापी शामियाने;
परि कोसळतां आग
अस्मानामधली
ज्याला झाला शिरच्छेद
आणि आहे उरलेलें
आज कबंध केवळ
मुरार बाजी समान ! ...
तळहातामाजीं माझ्या
आहे विराट सुरई
जिथे आहे सदाचीच
काठोकाठ भरलेली
दिवसाहि फुलणाऱ्या
काळया अंधारफुलांची
पिसाट वारुणी !!...
आणि आहे बिलगून
माझ्या छिन्न वक्षभाला
एक विशीर्ण—यौवना
जिच्या टपोर डोळयांत
नित्य नव्या नाचतात
भवभूतीच्या वेदना !!...

अशा शाहो दुनियेंत
रंगुनिया अहोरात्रीं
रक्ताळले ओठ माझे
मालकंसा आळवितो—
'विपदः सन्तु नः शश्वत्
विपदः सन्तु नः शश्वत् !'

जळींचा भोंवरा

जळींचा भोंवरा उद्दाम हासतो,
आपुल्या भवतीं कंफांत नाचतो;
करीत मौजेने प्रकांड गर्जन
दिशांच्या उरांत निर्मितो कंपन;
अल्लड लतिका कोठली ओढून
यौवन तियेचें टाकतो पिऊन,
आणिक लीलेनें फेकतो तियेला
रेताड ओसाड पैलच्या तीराला;
तुफान वाऱ्याचे सोशीत आघात
जातसे धीराने जहाज वेगांत
तेधवा आपुल्या कराल करांनी
ठेवितो तयाचें नरडें दाबुनी...

वाटतें तयाला— 'जीवन जीवन
म्हणती जयाला तेंच हें जीवन !
आपुला विलास आपुला निश्वास
यांतच नांदतें जीवन सुहास...'
वेडाच परी तो ! कळेना तयास—
हा तर केवळ जीवन—आभास !
म्हणती जयाला जीवन जीवन
आहे तें दूर त्या धुक्यांत गहन,
अक्षांश रेखांश यांचिया पल्याड
क्षितीजांपासून क्षितीजांपर्यंत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नीलम शद्वांत विधीने लिहिलें
अजर अमर सुरांनी भरलें....

लाभे न जीवन असें हें विराट
गतीचा नुसता मांडुन फुम्फाट,
प्रगति परंतु अंतर गिळून
निश्चयें घडवी जीवन-दर्शन;
अणूस अणूस पुढेच रेटीत
निघते सरिता पावलें टाकीत
भेटतो म्हणोनि तियेला सुंदर
अमोल आगळा सावळा सागर...
गतीचें बघून मायावी नर्तन
वाटतें असावें तियेंत जीवन
परंतु गतिही स्थितीच्या समान
जीवन दाविण्या असते अजाण...
रोगट कुबट डवक्यामधिल
चेतनाविहीन दुबळें सलिल
आयुष्यभरही तियेच राहतें
जियें तें एकदा सहज जन्मतें;
आणि हा भोंवरा-जयाच्या उन्मत्त
गतीस उपमा नाहीच विश्वांत-
नकळत तोही तियेंच राहतो
जियें तो एकदा सहज जन्मतो...

जिवंत मुडदा असा हा हासतो
आपुल्या भवतीं फेंफांत नाचतो !
करीत मोजेने प्रकांड गर्जन
दिशांच्या उरांत निर्मितो कंपन! !

क्षितीज

ही धरा आणि हें नभ मम मातापितरें
याहून कोणतें भाग्य हवें मज दुसरें
पार कृतघ्न केवळ मी न जाणितों हें की-
मजमुळेच होतें अशक्य मीलन त्यांचें !!

— वसन्त निनावे

एक लाल पायवाट

वळणाच्या पलीकडे
एक लाल पायवाट
मधूनच कुठेकुठे
उभा निवडुंग दाट.

पायवाट सरतांच
घन राई लवणांत
संथ निळ्या पाण्यामध्ये
प्रतिबिंब निहाळत:

लवणांत झुडुपांत
काळवेळ विसरून
झशांपरी बागडलों
विहरलों दोघें जण...

आज परी थबकतें
वळणाच्या तोंडावर
पाणावल्या नजरेने
निहाळतें दूरवर

उसासत पडलेली
एकलीच पायवाट
उरीं व्यथा अखंडित
मूकपणें जोजवीत !

— रमेश वाबगांवकर

झोंप मला येइना—

[जाति-सारिका]

झोंप मला येइना—
आज ग झोंप मला येइना
गुपित परीनें फिरवुनि अङ्गुलि लावियले वेड ना !

उद्यां यायचे तुझ्याकडे मज
परस्परांना कथायचे गुज

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नाचत नाचत वाजवूं अलगुज
नर्यं हंसुनी अल्लड चंचल डोलडोलवूं मना !

जागेपणची स्वप्नें पाहुनि
हुरहुर लागे अतांचपासुनि
वाजवि मुरलि कुणी आंतुनि
हृदयीं माझ्या नाजुकशी कशि अवतरली अङ्गना !

वाढूं लागलें हृदयस्पन्दन
अधरांचे हो कम्पन बन्द न
तनू थरथरे, होई मन्द न
उछ्वासहि बघ तुफानला किति हा चिरसम्मीलना !

कुशीवर कुशी बदलूं मी किति
अस्वस्थाऽधिर होऊं मी किति
उघडझांप करुं नयनांची किति
झाला आजच पुनवेचा शशि जादूचा आयना !

पङ्ख लागले कल्पनेस आणि
मन्मन फुलले मधुर फुलांहुनि
हलके हलके–जवळीं येउनि
तुला यायच्याप्ूर्वि चुम्बिलें–हर्ष मनीं माइना !
झोंप मला येइना !

— निशिकान्त करकरे

लय

ज्याचेंत्याचें होवो भलें फळो एकेकाचें सुकृत
पाषाणाला येवो कळा देवपण दगडास मिळो
फिटो अंधार, वर वर तीळतीळ दिवस चढो
गोपूरांच्या कळसांना सोनियाचें तेज जडो
वरसातीच्या धुंदीमध्यें बनाबनांत नाचोत मोर
चंद्रजल निळें पिऊन होवोत तृप्त, तृषित चकोर

भव्य संकल्पांचें स्वप्न मनामध्यें फुलत असतें
आणि तेव्हां मला माझ्या अस्तित्वाची जाणीव नसते

आणि कधी–
आणि कधी विश्व अवघें मीच एकला घेतो व्यापुन
भव्य माझ्या प्रासादाची आभाळाला भिडे उंची
सौधावरी नेत्रदीपक उतरतीही तारका
कोटिकोटी दीप पिवळे निळे जांभळे उजळतात
सतारीचे सूर कोमल चांदण्यांत झिमझिमतात
नूपुरांचे नाद मृदंगाच्या लयींत शहारतात
अप्सरांचीं गीतें–स्मितें मादकतेंत भिजोनिया
अमृताच्या धारा होऊन ओठांवरी ठिबकतात
झिरझिरीत वस्त्रांचिया घुक्यामध्यें नग्न यौवन...
मस्तोचिया मद्यांत भिजून चिब होई तनमन

मधुर असें स्वप्न कधी मनामध्यें झुलत असतें
आणि तेव्हां दुनियेची मला मुळी जाणीव नसते

आणि कधी–
आणि कधी सोंसाटत येई वादळ
मोठमोठे वृक्ष पडती उन्मळून धाड धाड
सारीकडे सर्वदूर भरून राही धूळ धूळ
व्यापुन दिशा व्यापुन अंबर
खवळतात महासागर पर्वतप्राय उठती लाटा
भीषण होती स्फोट कुठें उठती लोट धुरांचे
डोंगरांना लागे आग–हादरे धरा
बुजून जाती काळ्याकुट्ट प्रळयांत जीवन–वाटा
भयानक स्वप्न असें मनामध्यें फुलते केव्हां
मला नसते माझ्यासह दुनियेची जाणीव तेव्हां

आणि केव्हां
सागर असती शांत आणि नद्या देती निळ्या लहरा
हिरव्या शाखेवर बसल्या पांखरांना येई गुंगी
दवांत भिजलीं फुलें झुलतीं पानांचिया पाळण्यांत
मंदमंद वारा खेळे सुगंधाचें स्मित उधळीत
ओल्याकाळ्या मातीमधून डोकावतात हळुच वर
लाल कोवळे नाजुक अंकुर
रानफुलें इवलीं देती फुलपांखरांना अबोल आव्हान
क्षितिजाशीं हसरीं अभ्रें सप्तरंगी इशाऱ्यांतुन
आळसलेल्या धरतीला सांगतात हिर्वा मंत्र
खुणावतेंही आकाश जांभळ्या भारावल्या डोळियांनी

धुंद असें स्वप्न केव्हां मनामध्यें फुलत असते
आत्म्याची अनंताशी लय तेव्हां लागली असते !

— उ. रा. गिरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कै. भालचंद्र लोवलेकर

★ ★ ★ लेखक : शरच्चंद्र मुक्तिबोध ★ ★ ★

–१–

१९४५ साल. उज्जयिनी. लायब्ररीतून वाचन संपवून जिना उतरून खाली आलों. दुरून एका व्यक्तीला रस्ता ओलांडताना पाहिलें. शक्य तितक्या त्वरेनें जवळ जात मी विचारलें– का हो, कसं काय ! अन् लोवलेकरांची खबरबात ?

' म्हणजे ? तुम्हाला नाही माहीत ?'

' नाही !'

' ते वारले ! ते वारल्याला दोन आठवडे झाले !!'

त्या व्यक्तीचा चेहरा पांढरा फटफटीत पडला होता. लोवलेकरांचे लहान बंधू होते ते.

' पण...'

मला कांहीच उमजलं नाही; मोठी जखम झाल्यावर एक क्षणभर सगळं कांही सुन्न होऊन जातं, सगळ्या संवेदना पार बधिर होऊन जातात...!!

–२–

लोवलेकरांसंबंधीं लिहिणं अवघड आहे. जाणून किंवा नेणून जास्त गडद रंग भरले गेले तर त्यांना तें खपलें नसतें.

प्रत्यक्ष आयुष्य ते उत्कटतेने जगले होते; व्यवहारी जगाच्या दृष्टीनें ' अत्यंत बेफामपणें ' जगले होते. पण त्याची जाणीव त्यांचे ठिकाणीं नव्हती. ते साधे होते. त्यांच्यासंबंधी लिहिताना फार जपून लिहायला हवें आहे, सच्चेपणानें लिहायला हवें आहे असें मी मनाला वारंवार बजावतों आहे !

त्यांची ती मूर्ति माझ्या डोळ्यासमोर अजून उभी आहे. त्यांचा तो मनःपूर्वक हंसण्याचा किंचित घोगरा नि शुष्क पण सुखावणारा ध्वनि अजून कानांत घुमतो. सायंकाळच्या वेळीं रेशिमवाला लेनच्या बाजूने गेलें कीं अजून वाटतें बेंद्रयांच्या वाड्यासमोर थबकावें नि हाक द्यावी– ' आहांत का हो लोवलेक ऽ ऽ र ' वाटतें हटकून परत–हांक येईल– ' या हो ऽ ऽ'

पण आता तशी परत हाक येत नाही. सात आठ वर्षें अगदीं हटकून परत हाक येत असे आणि तासचे तास साहित्य राजकारण आणि विशेषतः जीवनावर बोलतां बोलतां निघून जात. ते दिवस किती लौकर निघून गेले ! एका अनुभवी, निगर्वी, प्रेमळ, जगांतील सौंदर्याचा एकनिष्ठ उपासक, प्रेमवीर परंतु अस्सल जीवन जाणकाराचें अंतर्यामाच्या तळाशी असणारें गूढ औदासीन्य अंगी बाणलेल्या व्यक्तीचा सहवास लाभला होता. तो नाहीसा होऊन आठ नऊ वर्षें होत आली. फोडावर जरासा हात फिरताच तो दुखावा तशी त्यांची स्मृति दुखतें आहे.

–३–

लहानसर बांधा, झुपकेदार केस, बटरफ्लाय मिशा, जाड ओठ, गव्हाळरंग, चैतन्यानं चमकणारे डोळे, दिलखुलास हास्य, हात गुंडाळून जगाच्या गडबडीकडे बघत राहणाराची निर्भ्रम वृत्ति, आणि मनांत निसर्ग आणि प्रणयांचें उत्कट संगीत.

अफाट उघड्या मैदानांत
या टोकाहुन त्या टोकास
असा सारखा चोविस तास
फिरे झिंगला अंबर–वात

माळ्यावर ह्यांची बैठक. तिच्या बैठ्या खिडकीमधून दूरवर पसरलेल्या विटक्या काळ्या कौलरांच्या लाटांवर लाटा दूरवर पसरलेल्या ! नि समोर ही मूर्ति... बसलेली. मी म्हणतो आहे – It's the fury of life ते हसतात. म्हणतात – It's a good

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

expression. खरेंच जीनक्रिस्तोफ मधून मी ही अभिव्यक्ति वाचलेली असते.

—४—

मी कित्येकदां मनांशी विचार केला कि लोवलेकर कसे आहेत ? ते बेछूट प्रेमवीर असल्याचें ऐकतों; कीं हा माणूस एक तत्वज्ञासारखा अलिप्त — प्रेमळ, सहानुभूतिपूर्ण हृदयाचा एक जुना माणूस आहे.

कीं हा दोन्हीही आहे ?

—५—

लोवलेकरांचं नांव इंदूरला शिक्षणाला जाण्यापूर्वीच ऐकत होतों. लोक त्यांच्याविषयी अफाटपणें बोलत. त्यांचा हुक्का, त्यांचं पुस्तकांनी वर्तमानपत्रांनी भरलेलं माळवद; त्यांची 'कलंदरी' वृत्ती, ते त्यांचे पायी शेकडों मैलांचे प्रवास आणि त्यांच्या घरावाहेर तीं डौलानं निळी जांभळी मान हालवीत दाणे टिपणारीं आकाशी रंगाची कबूतरं...!!

मी पहिल्या प्रथम त्यांच्या घरावाहेर उभा झालों तो खरेंच निळी जांभळी कबूतरं दाणे टिपतांना दिसलीं...

त्यांच्या संबंधी वर्णिलेल्या गोष्टी सर्वच खऱ्या होत्या. सांगणारांनी त्यांना अद्‌भुततेची डूब दिलेली असे. नेमकी हीच गोष्ट लोवलेकरांच्या व्यक्तित्वाशी विसंगत होती... नैसर्गिता, आहेपणा हाच त्यांचा स्थायी भाव. जणूं पाऊसपाणी पिऊन तृप्त झालेल्या धरणीतून हिरवें रोप फोफावत निघावें...

जणूं मनाच्या विराट प्राचीन भूमींत दडलेले झरे फेसाळत वर निघावेत...

आणि या पासून दुरावलेल्यांना हें सगळंच काही अद्‌भुतरम्य वाटावं...

तसं लोवलेकरांच्या बाबतींत झालं असावं. रूप रस स्पर्श गंधाच्या दुनियेतून त्यांच्या व्यक्तित्वाच्या नाड्याच वाहत होत्या. निसर्ग आणि ते एकच होते. त्याची माणुसकीहि तितकीच साहजिक होती... तिच्या विषयी जाणीवहि त्यांनी बाळगली नाही...

शुभ्रपांढरी कापुस बोंडे आलि ग आली तोंडीला
तुझ्या सारखी हंसत माधुरी सखी जिवाला जोडीला

हें जितके सहजपणें ते म्हणून जात तितक्याच सहजपणे लाजत लाजत पंगतींत पाटावर बसणाऱ्या नववधूच्या विभ्रमाकडे पाहून ते उद्‌गारत —

ही पदर सावरी नवी नवरी
पंगतींत उचलला घास करी ...

हीच सहजता सगळीकडे...

म्हणून त्यांच्या भेटीला जाताना घावरणारें मन त्यांना भेटताच आनंदाने भरून आलें.

आजारानें पिवळ्या जर्द झालेल्या तोंडावर हंसू आणीत ते म्हणाले होते — परिचय झाला... पुढे काय ?...
मुझे कुछ सुनाइये... "

त्यांचा 'मुझे' ऐकून मी हंसलो. 'झारी' उच्चारताना आपण झ चा उच्चार करतो तसा त्यांनी केला होता. खरें म्हणजे झेलम म्हणताना करतों तसा उच्चार त्यांनी करायला पाहिजे होता. मी त्यांना हंसण्याचे कारण सांगितले...

पण असाच उच्चार ते नेहमी करीत आणि त्यांचा तसाच उच्चार मला आवडत असे...

—६—

लोवलेकरांची त्यानंतरची पहिली भेट. हातांत एक लांब रजिस्टर घेऊन मी दबकत दबकत त्यांच्या घरच्या अंधाऱ्या पायऱ्या चढूं लागलों... दाराशीं उभा झालो.

खोली धुरानं भरून गेली होती. समोरच्या खिडकींत पुढे माझे मित्र झालेले चित्रकार सोलेगांवकर, शेजारच्या बळकटीवर विलायती उंची पोषाख केलेले एक मुसलमान तरुण गृहस्थ — मधोमध लोवलेकर आणि नुकताच चहापानाचा कार्यक्रम संपलेला... मला पाहताच त्यांनी आंत बोलावलें. मी नाखुशीने आंत गेलों...

माझ्या तेथे जाण्यानें त्यांच्या मैफलींत व्यत्यय तर आला नाही ना ही शंका येऊन मी अस्वस्थ झालो होतो, 'मी जातो... येईन मग !'

'वा, असं कुठे झालंय् का ?'

माझं येण्याचं कारण त्यांच्या नीट लक्षांत होतं.

'बसाल तर ...'

त्यांनी माझ्या हातातलं बाड काढून घेतलं. आणि

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोडयाच वेळांत त्यांतल्या कविता–कथा वाचण्यांत ते गढून गेले. मध्ये मध्ये ते म्हणत 'बहुत ठीक तो है... छान'

ते कांही पूर्ण वाचीत नव्हते. भराभर पानें उलटत होते. कापडाच्या दुकानांत गेल्यावर माणूस ज्या सराईतपणानें कापडाचे पोत पाहतो किंवा रत्नाची पारख करताना पारखी ज्या सराईत नजरेनं तो नग न्याहाळतो त्याच सराईत वृत्तीनं ते लिखाणातून व्यक्त होणाऱ्या भावभावनांच्या विश्वाचें मोल जोखीत होते; त्यातून व्यक्त होणारें व्यक्तित्व पारखून पाहत होते... माझीच पारख ते करीत होते...

त्यांचे मित्र शांतपणे बसून होते. मला फार नवल वाटलं, धीर वाटला. आपल्या या कृतीनं लोवलेकरांनी माझ्या सारख्या अपरिचिताला इतर मित्राच्या बरोबरीनं बसवून नवखेपणाचा अंतराय त्याच दिवशी नाहिसा करून टाकला. आणि निराळया प्रकारची मैफल असताहि संकोचानं लपवूं पाहत होतों ते बाड वाचून त्यांनी आणखीहि काही सूचित केलं...

हे लोवलेकरांचं वैशिष्ठ्य होतं...

त्यांच्या बैठकींत सगळे एक होऊन जात. अंतराय तावडतोब फिटे... दैनंदिन गोष्टींत एक नवीच लज्जत असल्याचा भास होई ....

बाड चाळून झाल्यावर ते म्हणाले–
'वा: ठीक तर आहे !... आप है...!!'
ते परिचय करून देऊं लागले !...

–७–

लोवलेकरांना ओळखायचें म्हणजे त्यांना माळव्याच्या भूमीतच पाहिलें पाहिजे. जणूं माळव्याच्या भूमींतूनच ते तेथील फुलाफळांप्रमाणें, पर्वतराजी व प्रपातांप्रमाणें उगवले होते. तेथील जीवन–कसाच्या चैतन्यलाटा शिळांशिळांतून, वृंध्यावृंध्यातून, कणाकणातून वाहत असतील तर त्याच त्यांच्या काळजाच्या ठोक्यांतून व्यक्त होत होत्या. माळव्याच्या रंगजादूमुळे माळव्यात उत्तम चित्रकारांची एक परंपराच निर्माण झाली. आजचे प्रसिद्ध चित्रकार बेंद्रे, चित्रकलेशी अव्यभिचारी' निष्ठा बाळगून मातीचे रंग तयार करून त्यांच्या साहाय्याने चित्रें रंगविणारे, चित्रकार सोळेगांवकर, मनोहर जोशी, आणि आजचे पुढे आलेले देवकृष्ण जोशी, चिंचाळकर हे सारे प्रतिभाशाली कलावंत चित्रकार माळव्याचेच. माळव्यांतील सोनेरी पिकलेलीं गव्हाचीं शेतें, पिवळयामातीनें सारवलेलीं, लखलखीत दिसणारीं सुबक झोपडयांचीं खेडीं, निळया जांभळया डोंगर रांगा, जंगलें लालीलाल करून टाकणारीं पळसवनें, जांभळे निळे लहंगे आणि पिवळया ओढण्या घालून फिरणाऱ्या गव्हाळ रंगाच्या मालव स्त्रिया... तिचें वर्णन लोवलेकरांनी कसें केलें आहे पहा.

'डोंगर खडका मधून जाते तरणीताठी पोर
पारधिणीची फंद फितूरी विलोल नयनीं घोर

मनगटांवरी कडा रुपेरी
दातांची शोभा चंदेरी
नच भिल्लिण, माळवीण गोरी

ठकवी गालीं छटा, भांग मुखि डुले रुपेरी बोर...

किंवा ही माळव्याची गुराखीण–
पापणी लांब तूं गुराखीण मस्तानी
ओढयांत कडेला खळखळ करतें पाणी...
तव गव्हाळ कांती गहू माळवी दाणा
पाठीवर कुरळे केस रुळति फिरताना

किंवा माळव्याच्या वन्य विभागांत मांडवगडाशीं लोवलेकरांनी पाहिलेली भिल्लीण.

माथ्यावर काळा माठ नेसणी लाल
भिल्लीण मृगाक्षी निर्भय ठुमरी चाल...

भरपूर प्रकाश, तजेलदार रसरशीत उबदार रंग, प्रत्येक दावातून निसर्गाची लय प्रकटविणारे कुंचल्याचें काम,.... इंद्रिय संवेदनांना जागृत करणारी शरिराच्या नसानसातून लाटा वाहविणारी Flesh & blood मधील एक मूळ चेतना चेतविणारी कला. – ती वृत्ती. चित्रकार बेंद्रयांच्या चित्रांची जी प्रकृति तीच लोवलेकरांच्या कवितेची...

त्यांच्या एकंदर व्यक्तित्वाचें D. H. Lawrence च्या व्यक्तित्वाशीं मला विलक्षण साम्य आढळतें. लॉरेन्स प्रमाणेंच त्यांचाहि बुद्धीपेक्षा संवेदनांवर (Sensations) किंवहुना Instincts वर जास्त भरंवसा होता. किंवहुना ते Lawrence च्याहि एका दृष्टीनें एक पाऊल पुढे गेले होते. लॉरेन्सप्रमाणें त्यांनी लैंगिक गूढवाद (Sex Mysticism) तयार केला नाही. कसल्याहि एक तत्वज्ञानाचें .त्यांना वावडें होतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व्यासंग दांडगा असूनहि त्यांचा विश्वास संवेदनांवर आणि त्याच्या उत्कट आनंदावर होता.

आणि हा संवेदनावाद एका निर्मळ माणसकीमुळे पूर्णपणें निकोप, रसरशीत अशा कवितेला जन्म देऊं शकला...

सर्व प्रकारच्या वैचारिक आग्रहापासून मुक्त राहून वस्तूच्या उष्ण गाभ्याला लोवलेकर सरळ एकदम हात घालीत...

सवंग सुखवादांत आणि लोवलेकरांच्या या वृत्तींत जमीन अस्मानाचें अंतर होतें...

या जीवनासक्त कवीची मूळ बैठक त्यांच्याच शब्दांत अशी देतां येईल–

वाऱ्यावरती विळा चालवूं काहि न निष्पन्न
नशिबाशी न करावा झगडा, जग त्याचें अन्न.

–८–

त्यांच्या या नशीववादाशीं जुळतें घेणें मला शक्य नव्हतें. त्या काळीं गांधीवाद आणि अध्यात्म ही माझी श्रद्धास्थानें होतीं. एक प्रकारची गूढ प्रतीति होते आहे असें मला वाटे. विश्वात्म्याशीं तदात्म होण्यासाठीं माझ्या आत्म्याला उत्कट ओढ लागली आहे असें वारंवार मनाशी म्हणे. लोवलेकरांबरोबर फिरावयास जाताना एकदां मी आपली ही मनोवृत्ति बोलून दाखविली आणि त्या गूढ आनंदाचें उदाहरण म्हणून कबीराची ही ओळ त्यांना म्हणून दाखविली–

गगन गरजि वरहौ अमी, बादर गहिर गभीर
चंहुदिसि दमकै दामिनी भीजै दास कबीर.

लोवलेकर उत्तमपैकी ऐकणारेहि होते. ते खाली मान घालून ऐकत चालले होते...

'मलाहि तसंच कांहीसं...'

त्यांनी मान वर केली. जरा शुष्क नि:थंड आवाजांत ते म्हणाले– Run to a doctor !!

अगदीं सहजासहजीं थंडपणें मजवर घण घातला. आपल्या हातून काय झालें याची त्यांना कधीच जाणीव झाली नाही...

माझ्यांत कांही बदल झाल्याचें मी त्यांना मुळीच दाखविलें नाही. परंतु त्या थंड शुष्क प्रश्नानें मला विचलित करून सोडलें होतें.

लोवलेकरांच्या अनुभववादी शिळेवर माझ्या अनेक गोड आदर्शवादी कल्पनांचा चक्काचूर होत गेला...

मी माझ्या अस्सल व्यक्तित्वाकडे भराभर जाऊं लागलों !

आणि लोवलेकरांना हें माहीत असेलहि. नसेलहि.

त्याच दिवसांत माझ्या मनांत जे एक सामाजिक तत्वज्ञान उदयाला येत होतें, त्याला लोवलेकरांचा सहवास पोषकच झाला. आदर्शवादी, ध्येयवादी रंगीत धुकें नाहिसे होतांच लखलखीत दिसूं लागले. सारें जसेच्या तसे. उघडे बोडखे !

तेव्हा त्यांत दिसून आलें कीं लोवलेकर म्हणजे कसलाहि निवारा न घेतां उघड्या माळावर एकटा पडून राहिलेला एक उघडाबागडा दगड आहे...

त्यानें सूर्याची किरणें, पचविलीं आहेत... धुंआधार पावसाचा मारा त्यानं मजेनं झेलला आहे...

एक दिवस त्यांना माझं एकंदर मत परिवर्तन बोलून दाखविलं. ते किंचित हसून म्हणाले– You will change your Gods.

मी निराश झालों – माझ्याविषयीं – त्यांच्या विषयीं.

–९–

एक सात आठ वर्षाचा मुलगा घर सोडून निघून जातो. कुठे तरी बडोद्याकडे. तो पिंपळाच्या पारावर रडकुंडीला येऊन एकटाच वसला असतांना त्याचे मामा (अथवा इतर कुणी तरी) त्याचा शोध करीत येतात. तो त्यांच्या खांद्यावर बसून घरी येतो. डोळ्यांतून अश्रू वाहत असतात ....

सतरा अठरा वर्षाचा दाढी वाढविलेला धोतर सदरा घातलेला पोरगा (बहुतेक अनवाणी) कॉलेजांत जातो आहे. तो लोकांच्या दृष्टीने वल्ली आहे. आपल्या प्रेयसीचा फोटो मिळवायला तो वाटेल ते दिव्य करील.

हृत्कुंजामधि कृष्ण मुरारी
मूक बासरी हृदय विदारी
दारा जवळी हळूच जावें
डोळा झाकुन फटिंत पहावें

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्वास रोखुनी कानहि द्यावा
लाजुनि भिउनी पाय फिरावा
पार पळाली परि ती भीती
उभाच राहिन 'दारावरती

हे तिघे चौघे कलावंत मित्र. त्यांत बहुतेक बेंद्रे व सोळेगांवकर आहेत. तो म्हणजे लोवलेकरहि आहेत. मंडळी इंदूरहून राजस्थानकडे पायीं प्रवासाला निघाली आहे. जवळ पेट्या भरभरून घेतल्या आहेत — धान्यानें. दरकूच दरमजल करीत ते चालले. तिघेहि अस्सल कलावंत आहेत. सभोवरचें जीवन टिपून घेत आहेत. सभोवारच्या जीवनाची नवीन रंग-संगति आत्मसात् करीत आहेत .... मंडळीचा मुक्काम अजमिरास (किंवा तेथेंच कोठें तरी) झाला. एका मुस्लिम सद्गृहस्थाकडे रात्रौ मुक्काम ठेवण्यांत आला. अवलियांची बडदास्त उत्तम राखली गेली. आणि तशांत त्या मुस्लिम सद्गृहस्थांची यौवनसंपन्न 'मुलगी विद्युल्लतेसारखी क्षणमात्र प्रकट होऊन अंतर्धान पावली ...

तिच्या प्रकट होण्याचें वर्णन जेव्हा लोवलेकरांनी केलें होतें तेव्हा तें मला विलक्षण जिवंत वाटलें होतें ...

या व अशा अनेक घटना मला लोवलेकरांनी सांगितल्या होत्या. त्यांच्या बरोबरचे मित्र अधिक ठसठशीतपणें त्या डोळ्यासमोर उभ्या करूं शकतील. त्यातील तपशील दुरुस्त करूं शकतील. तसें झाल्यास त्यांचे व्यक्तित्वच उठावदारपणें व्यक्त होईल ...

लोवलेकरांनी सुस्पष्ट असें तत्वज्ञान कोणतेंच अंगिकारलें नव्हतें. परंतु कलावंताच्या एकाकीपणा-बाबत, Bohemian वृत्तीबाबत त्यांचा आंतून आग्रह असावा ...

मी त्यांना सांगितलें होतें की— 'अशा कलावंताचें जीवन बाह्यत: गतिशील दिसलें तरी त्यांत अंतर्गति (Inner Dynamism) राहील का? तुमच्या वाङ्मयांतील, वस्तुनिष्ठ चित्रात्मकता मनांत भरते. परंतु. . . . आणि तुमचा तो Bohemianism आतां कुठे गेला ?—'

ते स्तब्ध बसले. तंबाखूचा बार संयपणे तोंडात भरून ते बोटें चाळवीत म्हणाले, 'माझ्या समोरहि तोच प्रश्न उभा असतो. . पण ही तेरा माणसं. . . मी असं कांही मनांत आणलं कीं ही तेरा तोंडं 'आ' करून मजकडे पाहताना मला दिसतात. Well, I am weak to that extent' (त्यांनी उच्चारलेलें हें वाक्य जसेंच्या तसें दिलें आहे)

'मग ?'

त्या मगचें उत्तर देण्याच्या भानगडींत ते कधीच पडले नाहीत. प्रश्नोत्तरांना फारशी किंमत त्यांनी कधीच दिली नाही. येणाऱ्या प्रत्येक क्षणाचं उत्सुकतेनं स्वागत करणाऱ्या या लोवलेकरांच्या तोंडावर पश्चात्तापाची पुसटशी छायाहि दिसणं शक्य नव्हतं...

—१०—

लोवलेकरांचा मित्र परिवार मोठा होता. त्यांत सर्व प्रकारचे सर्व जातीचे आणि मनाच्या सर्व प्रकारच्या ठेवणीचे लोक होते. आणि त्या सर्वांच्या वृत्तींशी समतानता साधणारें त्यांचें मन उदार आणि विश्वस्त होतें. कुठल्याहि क्षुद्रतेपासून मुक्त होतें. ते साऱ्यांचे मित्र होते. ते दगडाधोंड्याचा, गवतांपानांचा, जंगलाचा आणि माळरानाचा वेगवेगळा सुगंध आणि Mood जसा ते नेमका ओळखीत तशीच प्रत्येकाच्या स्वभावाची वेगळीच खुमारी ते जाणत— सर्वांचेच साथी असत...

मला आठवतं आहे. एकदां एका सायंकाळी एक अद्यावत् पोषाख केलेला तरुण झपाट्यानें त्यांच्या घरांत शिरला आणि त्यांना जोराजोराने हाका देऊं लागला...

'कोण होता ?'

'शहाणे. He is always like that. मिलटरींत आहे. दोन दिवस सुटींत आलाय. आला म्हणजे तुफाना सारखा येतो.'

— आणि घरीं येणाऱ्या पट्टेवाल्याशी त्याच्या सुखदु:खाच्या गोष्टी बोलताना मी अनेकदां पाहिलें आहे.

आणि माळव्यांतील अनेक कवींवर त्यांच्या काव्याचा परिणाम झालेला आहे. स्वत: ते कुठल्याहि साहित्यिक वातावरणापासून अलिप्त असत. मित्रमंडळी बरोबर व्याख्यानाला हजर असलेच तर सर्वात मागील बाजूस कोपऱ्यांत ते बसलेले दिसत. प्रतिकूल मतें सहसा ते व्यक्त करीत नसत. एकदां साहित्यावरून बोलणें निघाल्यावर खांडेकर — फडके यांच्या संबंधीं बोलणें निघालें. गुणदोष चर्चा झाल्यावर ते सरते शेवटी म्हणाले होते —

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'पण या सगळयांनी मराठीच्या प्रगतीला हात भार लावला आहे. आणि त्या बाबत आपण त्यांचे केंव्हाहि कृतज्ञच राहिलें पाहिजे.'

–११–

लोवलेकरांविषयीं पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. पण त्यासाठीं बराच विस्तार करावा लागेल. कोणत्याहि प्रकारच्या तत्वज्ञानावर किंवा जीवन कल्पनेवर विश्वास न ठेवणारे लोवलेकर अखेरपर्यंत जीवनासक्त, ज्ञानासक्त आणि सर्वसामान्य राहिले. अखंड परिशीलना नंतर त्यांची बौद्धिकवृत्ति नकारात्मक झालेली असली तरी त्यांचा स्वतःचा जीवनप्रेमी आणि सहानुभूतिपूर्ण मानवीपिंड आठवला कीं त्यांचें स्वतःचें व्यक्तिमत्वच त्यांच्या नकारात्मक तत्वज्ञानाला एक जोरदार उत्तर होतें असें म्हणावेसें वाटतें. आज त्यांच्या काही कविता आपणासमोर आहेत. त्यांत त्यांच्या अनेक उत्तमोत्तम कविता नाहीत हें पाहून खेद वाटतो. त्यांचे गद्यलिखाणहि फार मोलाचें आहे. त्यांचें समग्र वाङ्मय ज्या दिवशी प्रकट होईल त्या दिवशीं अतिशय दिलदार सहप्रवासी मिळाल्याबद्दल मराठी रसिकांना खचित आनंद होईल. त्यांच्या आठवणी सांगायचा अधिकार श्री. चंद्रे, श्री. सोलेगांवकर यांना आहे. व ते जेव्हा आपले अनुभव सांगतील तेव्हां येथें जें पुसटपणें सूचित झालें आहे त्याचें खरें वैभव प्रकट होईल...

लोवलेकर सर्वांचेच साथी होते. त्यामुळे त्यांनी दिलें आणि आम्ही घेतलें अशी भाषाच मनांत उभी राहत नाही. पण त्यांच्या सहवासाचे दिवस हे अविस्मरणीय दिवस होते असें माझ्या प्रमाणेंच त्यांचे इतर मित्रहि निःसंकोच म्हणतील...

लोवलेकरांच्या अखेर–अखेरच्या कवितात 'चिराश्चर्य वर उंच गगन' ही कविता मला उगीचच आठवते. त्यांतील खालील ओळी बघा–

डोहावर नर्मदा प्रवाह संथ
नि चांदरात्र ही शोभिवंत
ये दूर दूर देवालयीन
गंभीर घोष अत्यंत क्षीण
लुप्त चिंता जरा
अन् तंद्रिता ये शरिरा
व्यर्थच उच्छृंखल मन करि चिंतन
मध्यरात्र पडशाळेची किनार
उंच उभ्या लिबाचा जीर्ण पार
जीव व्याधिने श्रांत त्रसित
अर्ध शुद्ध निश्वास क्षणिक
भंगेसें जीव–पात्र
नि चांदणी खुले रात्र
गगनासी आळवि दे मरण मरण

लोवलेकरांच्या मनांत असे भाव उमटण्याचें काय कारण असावें बरें?

की आधीं सांगितलें त्याप्रमाणें अंतर्यामाच्या तळाशीं असणारं गूढ औदासीन्य क्षणमात्र उसळून वर आलं?

–१२–

ते खेड्यापाड्यातून दौऱ्यावर फिरत होते. त्यांच्या सोबत एक चपरासीहि होता. एके दिवशी चपराशानें दाराशी बसून बरीच वाट पाहिली. मग तो खोलींत शिरला. रात्रभर वांत्या वगैरे होऊन (नक्की काय तें आठवत नाही) लोवलेकर बिछान्यांतच निधन पावले होते.

अनपेक्षितपणें ते निघून गेले! अखेरच्या क्षणीं त्यांचेपाशीं कोणीच नव्हतें...

एक हिरा हरपला होता.

अशा वेळी हालीने गालिबचें निधन झाल्यावर काढलेले उद्गार एकदम आठवतात–

बडे शौक से सुन रहा था जमाना
तुम्हीं सो गए दास्तां कहते कहते

सा सु र वा शी ण

लेखक : बाबा मोहोड

गल्लीवर कोंवडा आरवला. त्याच्या आवाजानं राधा झोपेंतून उठली. कृष्णरावांना गाढ झोप लागली होती. हिरव्या बांगड्यांनी भरलेला हात तिनं हळूच कृष्णरावांच्या मानेखालून काढला. 'सुखाचा काळ किती लवकर संपतो !' खाटेवरून उठतां उठतां हा विचार राधेच्या मनांत तरळला. तिनं झोपलेल्या कृष्णरावांकडे पुनः एक भावपूर्ण दृष्टिक्षेप केला.

राधा अंगणांत आली. अंगणांतला पारिजात तिच्या स्वागतासाठी फुलूं लागला होता. आकाशांतले दिवे संथपणानं तेवत होते. मावळता चंद्र क्षितिजाशी उद्दाम लगट करीत होता. पारिजातकाच्या फांदीवर झोपलेलीं पाखरं गळ्यांतगळा घालून खोल श्वास घेत होतीं. त्यांची मधुर हालचाल शांत वातावरणावर उमटली होती. वारा वहात होता. वेलीवरचीं फुलं उमलत होतीं.

गोठ्यांत बुधा गाय हंबरली. तिला का राधेची चाहूल लागली होती ? राधा बुधाशी गेली. पाठीवर थाप मारून तिचं अंग कुरवाळू लागली. बिचारी प्रेमळ बुधा ! तीहि शांतपणें उभी राहिली. कृतज्ञतेचे रोमांच तिच्या सर्वांगावर उभे राहिले.

काल संध्याकाळीं बुधा जंगलांतून घरी आली होती. राधा तिला बांधायसाठी तिच्या जवळ गेली. तिनं तिच्या गळ्याला दावं लावलं. बुधानं राधेचं अंग चाटलं. इतक्यांत राधेला उचकी लागली. 'संध्याकाळच्या वेळीं कुणी केली असेल आपली आठवण ?' राधेनं मनाला विचारलं. 'राजीवनं ?' 'हो. त्यानंच केली असेल. पुष्कळ दिवसांत आपण वहिणीकडे गेलों नाही, असं त्याच्या मनांत आलं असेल.' तिनं मनाशी तर्क बांधला होता. बुधानंहि संमतिदर्शक मान हलविली होती. राधेची उचकी बसली होती. बुधाचं अंग कुरवाळतां कुरवाळतां राधेला सारा प्रसंग आठवला. कसल्यातरी अंधुक हुंदक्यानं तिचं ऊर भरून आलं. ती सहज उद्गारली–

काल बाई अचानक
मला उचकी लागली
राजीवनं याद केली !

तिला पुनः राजीवची आठवण झाली. आईची आठवण झाली. वहिनीची आठवण झाली. सारं माहेर तिच्या नजरेसमोर नाचूं लागलं. राधेच्या नयनांत अश्रू चमकले. ती बुधाच्या पाठीवर मान टाकून दबत्या आवाजांत स्फुंदू लागली. बुधा राधेला सांत्वना देत जागींच उभी राहिली.

'ही कंदाशीण का अजून उठलीच नाही ? अंथरुणांतून सासू ओरडली. तिचा भयंकर आवाज राधेनं ऐकला. ती भानावर आली. पाणावलेले डोळे तिनं पदरानं पुसले. दळण दळण्यासाठीं ती जात्यावर जाऊन बसली.

माणसाचं मन स्थिर झालं की कितीतरी सुख-दुःखाच्या गोष्टी तिथें थैमान घालू लागतात. राधेचंहि तसंच झालं. दगडी जात्यांत ती ज्वारीचं पीठ करीत होती. स्मृतीच्या जात्यांतून जीवनांतलीं सुखदुःखें बाहेर काढीत होती.

सासुरवाशी जीवनांतल्या असंख्य स्मृतींनी तिला भरतं आलं. कृष्णरावांची अपार माया आणि सासूबाईंचा क्रूर सासुरवास या दोन्ही गोष्टी तिला रडवीत होत्या. सुपांतली ज्वारी कमी कमी होत होती. डोळ्यांतलीं आसवें गालावरून वहात होतीं.

दळण संपवून राधा अंगणांत आली. आकाशांत तांबडं फुटलं होतं. अंगणांत पारिजातकाच्या फुलांचा दाट सडा पडला होता. दरिद्री पतिव्रतेच्या गळ्यांत एकटंच मंगळसूत्र खुलून दिसावं त्याप्रमाणं एखाद दुसरी तारका आकाशाला भूषवीत होती. पहाटवारा वहात होता. लहानलहान पाखरांचीं जोडपीं मधुर गाणीं गात पारिजातकावर उड्या मारीत होती. राधा त्या पाखरांकडे पहात उभी राहिली. तिच्या हृदयांत माहेरच्या स्मृती दाटल्या. सासुरवासाचे अश्रु डोळ्यांत गर्दी करू लागले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रुणु झुणु पाखरा
जा माझ्या माहेरा

राधेचं अंतर्मन त्या पाखरांस उद्देशून बोललं. भुर्रदिशी पाखरं उडालीं. राधेचे अश्रु क्षणभर थांबले.

‘ एकदां तरी जाऊन ये ना रे राधेकडे. माझ्यापासून कधी न दुरावलेलो पोर ती. कसं तरी वाटत असेल तिला !’ राजीवची आई त्याला म्हणाली. डोळ्यांत जमलेले अश्रु तिनं पदरानं पुसले. जणु अश्रूंच्या मोलांतच तिनं राधेला विकलं होतं. राधा सासरीं गेल्यापासून ती नेहमी रडत रहायची.

एके दिवशी राजीव वहिणीकडे जाण्यास निघाला. तिचं गांव बरंच दूर होतं. उन्हाळ्याचे दिवस होते. भरदुपारची वेळ होती. ऊन मी म्हणत होतं. परंतु राजीव कुठंच विसावला नाही. रस्त्यावरच्या पाणपोईवर प्यालाभर पाणी तो प्याला नाही. सारखा घोडा हाकत होता. राधेच्या घरींच विश्रांति घ्यावी असा निश्चय त्यानं केला होता.

राजीव राधेच्या घरीं पोहोचला. तिथे त्यानं काय पाहिलं ? राधा भितीशी रेलून उभी होती. घरांतून तिची सासू फडाफडा बोलत होती. अश्रुपूर्ण नेत्रांनी राधा दाराकडे पहात होती.

बहीणभावाची नजरानजर होतांच राजीवनं मान खाली घातली. राधेच्या डोळ्यांतून घळघळा अश्रु वाहू लागले.

टिनाच्या पत्र्यावर पर्जन्याच्या धारा वाजाव्यात तशी राधाची सासू फडाफडा बोलत होती. आणि राजीवच्या भरलेल्या नजरेसमोर राधेची केविलवाणी मुद्रा तरळत होती.

‘राधा लहानपणींच मेली असती तर ?’ राजीव उद्वेगांत उद्‌गारला. त्याला तिथं उभं राहणंहि असह्य झालं. तो तसाच घोड्यावर चढला. माघारी परतला.

राजीवची पाठमोरी आकृति राधेनं पाहिली. ती दाराच्या उंबरठ्यापर्यंत येऊन थवकली. पुढं पाऊल टाकणं तिला शक्य नव्हतं. ‘निदान भेटून तरी जा’ हे शब्द तिच्या ओठापर्यंत आले पण बाहेर पडले नाहीत. शब्दांची जागा अश्रूंनी घेतली. डोळ्यांतले अश्रू उंबरठ्यावर ठिबकले. राजीवचा घोडा दृष्टीआड होऊ लागला.

वाऱ्याच्या झुळुकीनं पारिजात हलला. दोनचार टपोरीं फुलं हवेवर तरंगत अंगणांत आलीं. राजीवचा घोडा दृष्टीआड झाला. कोकिळेचे अस्पष्ट मधुर स्वर हवेंत उमटल्याचा भास झाला. राधा दगडी पुतळ्याप्रमाणं तिथंच उभी राहिली. शेजारची नऊ वर्षांची नीला लाकडी जात्यावर गाणं गात होती —

भाऊ वहिणीच्या दारीं
भर उन्हाचा कहर
दोन पहार दुपार !
भाऊ वहिणीच्या घरीं
गेला कोण्या समयानं
केली गर्दी उन्हाळ्यानं !
भाऊ वहिणीच्या दारीं
उभा राहिला अंगणीं
नाही घंगाळांत पाणी !
टाकतांच पाय दारीं
सासुरवास ये कानीं
झालें काळजाचें पाणी !
आल्या पाउलीं कलोनी
उभा गल्लीवर राहे
बहीण आंतुनी पाहे !
वहिणीचा सासुरवास
नाही कानीं ऐकवला
जीन घोड्यावर केला !
मरो बहीण म्हणोनी
घोडा फिरवला रानीं
नाही पाहिलें फिरोनी !
सेवया वेटोळ्यांनी
उतरंड्या आगाशी
भाऊ निघाला उपाशी !
घरीं वासाचे तांदूळ
काय करता असून
सासुरवाशिनी बहीण !
घराच्या वळचणींत
उभी राहिली बहीण
‘म्हणे दादा जा भेटून !’
(वरील लोकगीताच्या आधारें)

★ ★ ★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समालोचन

नवें जग, नवीं क्षितिजें

(लेखक – प्रभाकर पाध्ये. प्रकाशक – ग. रा. भटकळ, पाप्युलर बुक डेपो, मुंबई, ७)

श्री. प्रभाकर पाध्यांना युरोप पाहण्याचें भाग्य लाभलें. इटाली, युगोस्लाव्हिया, स्वित्झर्लंड, इंग्लंड, फ्रेंच आणि इटालियन रिव्हिएरा हे भाग त्यांना युरोपच्या भूमीवर पाहायला मिळाले. पाध्यांचं अंतःकरण कथालेखकाचं, काव्यात्म, साहजिकच त्यांनी पाहिलेल्या सृष्टीचं कुतूहलपूर्ण दृष्टीनं वर्णन केलं आहे. युगोस्लाव्हियाच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवल्यापासून त्यांची दृष्टी 'मदिरमस्त' झाली आहे, तिला 'कोवळिक' आली आहे, अर्थात् त्यांच्या प्रवासवर्णनांतील निसर्गाचीं चित्रं बहारदार झालीं यांत नवल नाही.

पण या प्रवासवर्णनांतून श्री. पाध्यांनी जें युरोपचें दर्शन घडवलें तें फार महत्वाचें आहे. गेल्या महायुद्धाने यूरोपच्या भूमीवर झालेले व्रण अजून पूर्णांशाने बुजून आले नाहीत. पण प्रत्येक राष्ट्र थोर होण्याची धडपड मात्र करीत आहे. यांतच युगोस्लाव्हिया आहे. रशिया तोंडाला घालत असलेली वेसण, युगोस्लाव्हियाने वेळींच भानावर येऊन उडवून दिली. अमेरिकेने लगेच युगोस्लाव्हियाला आधार दिला. पण या आधाराचा अर्थ काय याची युगोस्लाव्हियाला पूर्ण जाणीव आहे. पाध्यांनी मार्शल टिटोशीं घेतलेल्या मुलाखतींत टिटोंनी काढलेले उद्गार या दृष्टीनें फार महत्वाचे आहेत, 'आमची त्या राष्ट्रांना वास्तवदृष्ट्या मदत होते, आमच्या सोव्हिएटशीं असलेल्या भांडणामुळें कम्युनिस्ट आक्रमणाची भीति कमी होते. म्हणून तीं राष्ट्रें आम्हाला साहाय्य करतात, ही भीति जर कमी झाली तर आम्हाला अशी मदत सुरूं राहील कीं काय हा प्रश्न आहे.' आजच्या काळांत या उद्गारांचें स्मरण प्रत्येक राष्ट्रानें ठेवावें अशा मोलाचे ते उद्गार आहेत.

ते भारतांतून गेले ते समाजवादी पक्षाचे 'म्हणून. पण युरोपमध्ये त्यांना एक अनुभव आला, निरनिराळया देशांत ज्या ज्या ठिकाणीं ते गेले, त्या त्या ठिकाणीं भारतीय म्हणूनच ते ओळखले गेले, भारतीय म्हणून त्यांना प्रतिष्ठा लाभली. सर्वत्र त्यांना भारतीयासंबंधी आदर दिसून आला, आस्था आढळली. याचीं अनेक उदाहरणें त्यांनी दिलीं आहेत. अमेरिकेसंबंधी मात्र भावना गढूळ आहेत. एका कॅनेडियनला त्यांनीं प्रश्न विचारला, आपण अमेरिकन कां?' त्यांवर तो म्हणाला, 'अमेरिकन म्हणून माझा अपमान कां करता? मी कॅनेडियन आहे. आपण जास्त निकटचे आहोत. कारण कॅनडा आणि भारत कॉमनवेल्थचे सदस्य आहेत.'

या प्रवासांत त्यांना अनेक व्यक्ति भेटल्या. परिषदांमधून कांही व्यक्तींशीं त्यांची ओळख झाली. त्यांच्यापैकीं काही व्यक्तींशीं त्यांचा निकटचा संबंध आला. अशांच्यापैकी एक एरिक जान्स्टन; एरिक जान्स्टन हा एक आंच लागलेला जीव आहे, पोळलेला आहे, पाध्यांनीं त्याच्याविषयीं हळूवारपणें, सहृदयतेनें लिहिलें आहे. मनू बॅनर्जी, मार्गारेट कार्टराईट, व्लादिमिर देदिएर, विल्फान पतिपत्नी, एव्हेलिन रेनाल्डस्, फ़ेनर ब्रॉकवे, ब्रेलसफर्ड वगैरे परिचित, अपरिचित व्यक्तींचेंहि दर्शन त्यांनी घडविलें आहे.

प्रवासांत त्यांनीं बघण्यासारखें पुष्कळ पाहिलें. युगोस्लाव्हियामधील पर्णस्खलनापूर्वीची शोभा, स्वित्झर्लंडमधील पाईन वृक्षांचें जंगल, कीटस् म्युझियम, परतीच्या प्रवासांतील बोटीवरचे अनुभव वगैरे भाग विशेष उल्लेखनीय आहे.

नवें जग आणि नवीं क्षितिजें ह्या पुस्तकाने मराठी भाषेतील प्रवासवर्णनपर साहित्यांत फार मोलाची भर पडली आहे. या ग्रंथाच्या योगानें युरोपचें अंतरंग आणि बहिरंग या दोन्हींची नीट ओळख होते. मराठी साहित्यांत युरोपच्या प्रवासाचीं तीन प्रवासवर्णनें महत्वाचीं आहेत. डॉ. गुण्यांचें, अनंत काणेकरांचें आणि समोर असलेलें श्री. पाध्यांचें. गुण्यांचा युरोप पहिल्या महायुद्धाच्या अगोदरचा, काणेकरांचा दुसऱ्या महा-

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युद्धाच्या अगोदरचा, पाध्यांचा युरोप दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरचा. या तिन्हीं प्रवासवर्णनांतून आढळून येणारी स्थिति मननीय आहे खास. युरोपमध्यें अथवा इतर खंडांमध्यें प्रवास करून आलेल्या इतर अनेकांनी प्रवासवर्णनें लिहिलीं आहेत. पण त्यांमधून माहिती निरसपणें देण्याचीच वृत्ति आढळून येते, रसिकतेचें प्रमाण अत्यल्प. म्हणूनच डॉ. गुणे, अनंत काणेकर यांच्या प्रवासवर्णनांचें महत्व. श्री. पाध्यांनीहि प्रवासवृत्त रसिकवृत्तीनें लिहिलें आहे, म्हणून 'नवें जग, नवीं क्षितिजें' चा उल्लेख, डॉ. गुणे, अनंत काणेकर यांच्या प्रवासवर्णनाबरोबर करावासा वाटतो.

वाटचाल

(लेखक – रा. भि. जोशी. प्रकाशक – वा. पु. भागवत, मौज प्रकाशन लि. गिरगांव, मुंबई, ४.)

वाटचाल या संग्रहांत श्री. रा. भि. जोशी यांनी लिहिलेले, वेळोवेळीं निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेले कांही प्रवासवर्णनपर लेख संकलित झाले आहेत. हे लेख लिहितांना श्री. जोशी यांची दृष्टी सामान्य प्रवाशाची नाही. प्रवासवर्णन लिहितांना ज्या स्थळाचं ते वर्णन करताहेत त्या स्थळीं जाणारा मार्ग, त्या स्थळाचा भूगोल, इतिहास अथवा तेथील सगळीं ऐतिहासिक महत्वाचीं अथवा सौंदर्यसंपन्न स्थळें, ही उपयुक्त माहिती ते देतीलच अशांतला भाग नाही, दिल्लीला ते गेले असतांना त्यांनी लाल किल्ला, कुतुबमिनार, बिर्लामंदिर या गोष्टी पाहिल्या नसतील अशांतला भाग नाहीं. पण दिल्लीसंबंधी लिहितांना त्यांना जतन करून ठेवण्यासारख्या स्मृति वाटल्या त्या वेगळ्याच. दिल्लींत त्यांना एक अनुभव आला. त्यांना हाराकरितां फुलं पाहिजे होतीं. फुलं मिळवण्याकरितां त्यांना वणवण करावी लागली. 'फुलं कुठं मिळतील' हें त्यांनी कुणाला विचारलं कीं कुणीतरी त्यांना पत्ता सांगावा. सांगितल्या ठिकाणीं जावं, तिथं फुलं मिळू नयेत आणि वेगळ्याच ठिकाणाचा पत्ता मिळावा. तिथं जावं, तो तोच प्रकार. 'आई मला पुरी, जा त्या घरीं' स्वप्नांतली गत. दिल्लींतला हा अनुभव वर्णन करतांना दिल्लींत फुलं मिळण्याची मारामार पडते अथवा दिल्लीमध्यें ह्या ह्या ठिकाणी फुलं विकत मिळतात, हें सांगायचं नाही. तर एक अनुभव त्यांना शद्बांकित करायचा आहे. 'वाटचाल'चा उपयोग निरनिराळीं स्थळं पाहायला निघालेल्या प्रवाशाला कमी असला तरी ज्याला अंतःकरण आहे, ज्याला सौंदर्याविषयीं आस्था आहे, ज्याला आपले अनुभव दुसऱ्याशीं ताडून पाहण्यांत सुख वाटतं, त्याला हा संग्रह खचित प्रिय होईल, तो त्याचें सुहृद भावनेनें स्वागत करील.

भारतीय अंतःकरणांत ज्या स्थानांविषयीं अपार श्रद्धा आहे, जीं स्थानं भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत, ज्यांच्या आसमंतांत भारताचा इतिहास घडला आणि संस्कृतीला आकार आला, आणि जीं सौन्दर्याचीं निधानं आहेत अशा कांही स्थळांचीं संस्मरणं वाटचालींत आहेत. 'गाङ्गंवारि मनोहारि' मध्यें हरिद्वार आणि हृषिकेश, 'पळसाचीं फुलें' आणि 'उर्दू बोलो' मध्यें लाहोर, 'दिल्ली एक अजायबघर' 'फुलांचा शोध' 'बझमे अदब' यांच्यामध्यें दिल्ली हीं उत्तरभारतांतील, माळवा, नर्मदेचा परिसर, वऱ्हाड हीं मध्यभारतांतील, आणि कृष्णाकिनारा, गोकर्ण, कारवार वगैरे दक्षिण भारतांतील स्थळें श्री. जोशांनी पाहिलीं. त्या स्थळांचं रूप, सौंदर्य अवलोकलं. तीं बघत असतांना त्यांच्या मनांत जागृत झालेल्या इतिहास पुराणें, संतवाङ्मय स्मृति त्यांनीं सांगितल्या आहेत, मनांत आलेले विचार नमूद केले आहेत. आणि हें करत असतांना कुठेंहि गोष्टीवेल्हाळपणा, औचित्यभंग होऊं दिला नाही. त्या वातावरणांत जे विचार सहजासहजीं निर्माण होणार नाहीत अशांना त्यांनी मुळींहि थारा दिला नाही. विचार आला तो सौंदर्याची जाणीव ठेवूनच आला. जिथं जिथं त्यांनी निसर्गाचीं चित्रं रेखाटलीं तिथं तिथं तीं अगदीं मोजक्या, समर्पक शद्बांतच. या चित्रांमध्यें भरलेल्या रंगाचा गोडवा, त्यांच्यामध्यें निर्माण झालेली हृद्यता 'वाटचाल' वाचतावाचता सहज कळून येईल. उदाहरणें द्यायला अवसर नाही.

श्री. जोशी यांचें गद्य प्रसादमय, प्रसन्न, प्रौढ आहे. भाषा ओघवती आहे. भाषेच्या ओघांत वाचक त्यांनी वर्णिलेल्या सगळ्या स्थळीं जाऊन येतो. त्याला असं वाटत नाही कीं, श्री. जोशांबरोबर आपण 'वाटचाल' करूं नये.

एका रात्रीची गोष्ट

(ले. माधव मनोहर, प्रकाशक. ग. रा. भटकळ, पाप्युलर बुक डेपो, मुंबई ७, किंमत ४.)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माधव मनोहर हे एकेकाळीं टीकालेखक म्हणून मराठी साहित्यजगतांत नांवाजले होते. नंतर त्यांनी स्वतंत्रलेखन केलं. 'ज्वाला' ही कादंबरी त्यांनीं लिहिली, अनेक कथा, नाट्यप्रवेश त्यांनीं लिहिले. मधूनमधून युरोपिअन भाषांतील, इंग्रजींत आलेल्या साहित्याचें त्यांनीं रूपांतर वा भाषांतर केलें. कॅरेल कॅपेकच्या 'आई'चें भाषांतर आणि व्हॅलेंटिन कॅटेव्हच्या 'स्क्वेअरिंग द सर्कल' या नाटकाचें रूपांतर सुप्रसिद्धच आहे. 'एका रात्रीची गोष्ट' ही त्यांची कादंबरी नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. ह्या कादंबरीचें मूळ जेराल्ड कर्शच्या 'ब्रेन अँड टेन फिंगर्स' या कथेमध्यें आहे. मूळ कथा मी वाचली नाही. तिचा विस्तार, तिची रचना, तिच्यांतील रचना कौशल्य, पात्रें, कथा निवेदन पद्धती यांच्या विषयी कांहीच कल्पना नाही. त्यामुळे मूळ कथा आणि 'एका रात्रीची गोष्ट' यांचा संबंध कसा आहे, याविषयीं कांहीच लिहितां येणार नाही. कादंबरी जशी मराठींत आली आहे तशीच ती विचारांत घ्यावी लागणार.

'एका रात्रीची गोष्ट' या कादंबरींत एका रात्रींतून घडलेल्या कांही घटना वर्णन करण्यांत आल्या आहेत. श्रीधर आणि त्याचे साथी यांनी शस्त्रागारावर केलेला हल्ला, या हल्ल्यांत त्यांनी मिळवलेलें साहित्य सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न, या प्रयत्नांतील आशा निराशेचा खेळ, संकटांशी यशस्वीपणें दिलेली झुंज, आणि शेवटीं त्यांना प्राप्त झालेलं यश ह्या कथाभागांतील प्रमुख घटना आहेत. या घटना कथेमधील चंदर, विठ्ठल, शेवंती, रशिद हीं पात्रें वर्णन करतात. चंदर, कथेची पार्श्वभूमि, शस्त्रागारावरील हल्ला, नंतर त्यांचें रानांतील ओढयावर येणे, पुरानें पूल उध्वस्त झालेला पाहणें, पुलाच्या अवशिष्ट भागावर ओंडके टाकून, ते बांधून नदीपार होण्याच्या प्रयत्नाचा आरंभ वर्णन करतो. नंतर इतर व्यक्ति कथासूत्र पुढेपुढें नेते. कथानकाचा समारोपहि चंदरच करतो.

कथेंतील सगळया व्यक्ति एका ध्येयानें प्रेरित झालेल्या आहेत. एका पाशवी शक्तीशीं त्या झुंज घेत आहेत. या पाशवी शक्तीनें या व्यक्तींपैकीं कांहींवर प्रत्यक्ष अत्याचार केले आहेत. कांहींच्या जीवलगांचे प्राण हनन केले आहेत. कित्येकांचीं घरं दारं, शेतीवाडी उध्वस्त केली आहे. शेवंतीची कथा करूण आहे, तिच्या अंतःकरणांत श्रीधर विषयीं ओढ आहे. आणि तिच्यावर अनेक शिपायांनीं बलात्कार करून तिच्या जिवाचा चोळामोळा करून टाकला आहे. या आणि अशाच प्रकारच्या जखमा या व्यक्तींच्या अंगावर आणि मनावर आहेत. त्यांतूनच त्वेषाची, विरोधाची भावना त्यांच्या अंतःकरणांत निर्माण झाली आहे. आणि याच भावनांमधून 'एका रात्रीची गोष्ट' घडली आहे.

ही कथा अनेक व्यक्ति सांगताहेत. सगळयांचेच जीवाभावाचे संबंध आहेत. प्रत्येकाच्या मनांत एकमेकाविषयीं आदर, निष्ठा आहे. त्यामुळें स्वभाववर्णनांची प्रसंगवर्णनांची पुनरुक्ति कंटाळा येईल इतकी झाली आहे. विशेषतः चंदरच्या प्राथमिक कथनांत हा प्रकार फार आढळून येतो. चंदर अनेक वेळा म्हणतो, मला कथा सांगता येत नाहीं, मला भान राहत नाही, सांगायला सुरुवात करतो एक आणि सांगतो भलतंच. चंदर घटना कथन करतो हें खरं, पण त्याच्या हातांत लेखणी आहे ती माधव मनोहरांची. विठ्ठल देखील चंदरनें सांगितलेला भाग पुन्हा वर्णन करत राहतो.यामुळें पुनरुक्ति मधूनमधून फार कंटाळवाणी होते. शेवंती आणि रशिद यांच्या कथनांत मात्र हा दोष नाही. या व्यक्तींच्या गोष्टीवेल्हाळपणांत माधवमनोहरांनाहि अवधान राहत नाही. ओंडके बांधण्याकरितां दोर नसल्यामुळें सगळया व्यक्तींनी आपली कांही वस्त्रप्रावरणं दिलीं असतात, चंदरनें पट्टा दिलेला असतो. पण श्रीधरने त्याला दिलेलं पुस्तक तो शेवंतीला देतो तें पट्टयांतून काढून. त्याचप्रमाणें विठ्ठलनें श्रीधरभाऊला अंगावर वाहून आणून एका झाडाखालीं बसवलेलें असतें. त्याच्या मुखावरील भावभावनांचें वर्णन करतो. समोर उभं असलेलं संकट, चंदरची कार्यव्यग्रता, ढगाळलेली रात्र, श्रीधर आणि इतर व्यक्ति यांच्यामध्यें असलेलं अंतर या सगळयांच्यामुळें चंदरला हें वर्णन शक्य नाही. कथेंत माधवमनोहर यांनी प्रवेश केला आहे.

परंतु हे दोष जुजबी आहेत. कादंबरीच्या वाचनीयतेला आणि यशाला ते बाध आणीत नाहीत. कादंबरींतील अत्यंत आकर्षक भाग म्हणजे तीमधील निरनिराळया व्यक्ति. श्रीधर हा टोळीचा कर्णधार, मेंदु होय. तो अत्यंत कणखर आहे. आणि तरीहि त्याच्या अंतःकरणांत काव्य, सदयता, माणुसकी आहे, भावनेचा ओलावा आहे. शस्त्रागारावर हल्ला करायला

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जात असतांनाहि त्याच्या आवडत्या कवितांचा संग्रह त्याच्याजवळ आहे. हल्लयांत तो घायाळ होतो, आणि मागावर आलेल्या शिपायांवर गोळ्या झाडताझाडता त्याचें प्राणोत्क्रमण होतें. विठ्ठल, चंदर यांच्याहि व्यक्तिरेखा मनोज्ञ झाल्या आहेत. पण सगळ्यांत सुंदर व्यक्तिरेखा शेवंतीची आहे. इतर व्यक्तिरेखा निर्माण करतांना माधवमनोहरांनी पाल्हाळ लावलेला असल्यामुळे त्यांची हृद्यता कमी होते. पण या दोषापासून ही व्यक्तिरेखा अलिप्त आहे. विशेषतः चंदर आणि शेवंती यांच्या स्वभावांतून तिच्या स्वभावाच्या ज्या बाजू दाखवल्या आहेत त्या करुण तर आहेतच. पण त्या जिवंत आणि वैशिष्टचपूर्ण आहेत. ह्या सगळ्या स्वभावचित्रांमुळेंच कादंबरी वाचनीय झाली आहे,

नागपूरचा सांस्कृतिक इतिहास

(लेखक– दे. गो. लांडगे. प्रकाशक– मध्यप्रांत संशोधक मंडळ, नागपूर. मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक ४).

या ग्रंथांत नागपूरविषयक, इतिहासापासून गोंधळ वगैरे बाबींपर्यंत, सगळ्या प्रकारची माहिती संकलित झाली आहे. ग्रंथाचें नांव पाहिलें तर तें मोठं वाटतें. पण ग्रंथ प्रत्यक्ष वाचल्यानंतर मात्र त्याचें दर्शन खोटें वाटतें. लेखकाला इतिहासाची दृष्टी नाही, आणि संस्कृतीच्या मूल्यांची जाणीव नाही. त्यामुळें अडगळ ज्याप्रमाणें विविध आणि अनंत गोष्टींचें संचयस्थान होते, त्याचप्रमाणें मिळाली माहिती कीं भर पुस्तकांत अशांतला प्रकार झाला आहे.

लेखक पुढें एक महाग्रंथ लिहिणार आहे. हा ग्रंथ, त्या ग्रंथाची परिचयपुस्तिका आहे. या ग्रंथांत लेखकानें अनेक ठिकाणीं विषय अर्धाच सोडून दिला आहे, विस्तारभय प्रकट करून हात आखडता घेतला आहे, आणि तो घेत असतांना वारंवार आपल्या महाग्रंथाची जाणीव वाचकाला देतो आहे.

जी माहिती या ग्रंथांतून आली आहे, ती टाकाऊ, निरर्थक आहे असं म्हणण्याचा माझा उद्देश नाही. परंतु सांस्कृतिक इतिहास म्हटल्यानंतर सांस्कृतिक मूल्यें निश्चित करून, संस्कृतीचीं गमकें ध्यानांत घेऊन, कालमानाप्रमाणें संस्कृतीच्या विकासाचं अथवा ऱ्हासाचं सूत्र न्यावं लागतं. पण या दृष्टीनें लेखकाचा प्रयत्नच नाही.

नंतर मनांत विचार येतो, तो हा, की नागपूरची कांही विशिष्ट, वेगळी, नागपुरी संस्कृति म्हणून उल्लेख ण्यासारखी संस्कृति आहे कां?

नागपुरी संस्कृतीचीं पाळंमुळं पाहिलीं तर तीं मराठी संस्कृतीचींच आहेत. तिचे संस्कार, परंपरा विकास पाहिला तर तोहि मराठी संस्कृतीहून भिन्न नाही. जर लेखकाला नागपुरी संस्कृति भिन्न वाटत असली तर प्रथमतः तो मुद्दा प्रस्थापित करायला हवा होता. केवळ स्थानपरत्वें निर्माण होणारे जुजबी भेद कांही नवीन, नागपुरी संस्कृति निर्माण करूं शकत नाहीत.

या ग्रंथाला सांस्कृतिक इतिहास या दृष्टीनें महत्व नसलें, तरी मनोरंजक माहितीचा संग्रह म्हणून त्याला महत्व आहेच. त्याचप्रमाणे या ग्रंथांत लेखक अनेकदां डोकावला आहे. इतकेदां, की तो स्वतःच ऐतिहासिक पुरुष वाटूं लागतो. साहजिकच इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां लेखकाचाच परिचय जास्त होतो. वाचकांना मी आठवा भाग वाचण्याची शिफारस करतो. कारण त्यांत लेखकानें आपलीं मतें प्रगट करून ठायींठायीं विनोद केला आहे. आजच्या जीवनाविषयीं त्याला सहानुभूति नाही. उलट हा त्याला थट्टेचा विषय वाटतो. आणि त्यामुळें पुढील प्रकार होतो.

'(हल्लीं) गोटपाटल्यांचीच मारामार, तेव्हां मस्तुरे, चंद्रहार, बाजूबंद कसे दिसणार! एकदाणी, चपलाकंठी व एक दोन सोन्याच्या बांगड्या एवढें असलें कीं बस्स झालें. स्त्रिया आम्हाला दागिने आवडत नाही म्हणतात मात्र, पण मिळतातच कोठें?'

'हल्लीं स्त्रियांचे पोट पूर्णपणें झाकलें असतें पण गळा व डोकें उघडें असतें.'

पुरुषार्थ

(साहित्यसम्राट श्रीपाद कृष्ण कोल्हटकर स्मरणांक)

श्री. व्यंकटेश वकील यांच्या कार्यकारी संपादकत्वाखालीं निघत असलेल्या 'पुरुषार्थाचा' जुलैचा अंक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'साहित्यसम्राट् श्रीपाद कृष्ण कोल्हटकर स्मरणांक' काढला आहे. ही गोष्ट अत्यंत उचित झाली आहे. कोल्हटकरांचें वाङ्मयीन ऋण आज हयात असलेले अनेक साहित्यकार मान्य करतात. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासांतील तात्यासाहेब कोल्हटकरांच्या कार्याची अनन्यता देखील मान्य करतात. परंतु साहित्यकारांची स्मृति सतत जागवून अभ्यासकांचें लक्ष त्यांच्याकडे वेळोवेळीं वळत राहील या दृष्टीनें मात्र साहित्य-धुरंधरांचे प्रयत्न अपुरे पडतात. या दृष्टीनें श्री. वकीलांनीं 'स्मरण–अंक' काढून महत्वाचें कार्य केलें हें जर म्हटलें तर त्यांत अवास्तव कांहीच नाही.

अंकांत तात्यासाहेबांच्या साहित्याच निरनिराळया अंगांचा मान्यवर समालोचकांनी परामर्श घेतला आहे. प्रा. पु. शि. रेगे यांनीं काव्य, प्रा. वा. ल. कुळकर्णी यांनी टीका, श्री. गो. गं. लिमये आणि श्री. विजय तेंडुलकर यांनी विनोद, श्री. पु. रा. लेले. श्री. प्र. शा. मांजरेकर, श्री. नी. म. केळकर यांनी नाटकें, अशा प्रकारें श्रीपाद कृष्णांच्या निरनिराळया साहित्यशाखांचें दर्शन घडवलें आहे. श्री. वा. ना. देशपांडे, श्री. श्री. रा. टिकेकर यांनी कांही आठवणी दिल्या आहेत. कोल्हटकरांच्या कविता, त्यांनी लिहिलेलीं संस्मरणें आणि बालकथा हें साहित्यहि देण्यांत आलें आहे. सगळेंच साहित्य वाचनीय आहे. अंक संग्रहणीय झाला आहे.

योग्यवेळी आणि योग्य प्रकारें 'स्मरणांक' काढून पुरुषार्थानें एक महत्वाची कामगिरी बजावली, या करिता संपादक, कार्यकारी संपादक अभिनंदनाला पात्र आहेत.

चंद्रपुरी कवि

गोंडवन ग्रंथमाला, सुमन ३ रें संपादक व प्रकाशक गो. बा. पुल्लीवार. शारदा प्रकाशन चांदा.).

चंद्रपूर येथील सहा कवि–कवयित्रींचें काव्य या संग्रहांत समाविष्ट झालें आहे. कवींचें काव्य, छायाचित्र आणि परिचयासकट देण्यांत आलें आहे. विविध कवींचा काव्यसंग्रह तयार करतांना ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता असते, त्या सगळया या संग्रहांत आहेत. परंतु ज्याकरितां या ग्रंथाची उभारणी झाली, तें यांतील काव्य मात्र अत्यंत सामान्य आहे. काटकर, विगम, यांच्या काव्यांतला सूर जरी योग्य असला तरी कल्पना, रचना, आणि काव्यसौंदर्य यांच्या बाबतींत त्यांची कविता सामान्य पातळीवरच राहते. यांतली कांही कविता प्रासंगिक आणि घरगुती स्वरूपाची आहे. ती अत्यंत शिथिल आहे. हा संग्रह केवळ हौसेचा प्रकार आहे, त्यामुळें काव्याच्या अंतरंगांत शिरून त्याची चर्चा करणेंच अयोग्य होईल.

पराग

पराग या नांवाचें पाक्षिक नागपूरांत काढण्यांत आलें आहे. कांही तरुण मंडळीचें हें कार्य आहे. या पाक्षिकाचे संपादक श्री. हरिहर गोविंद येगांवकर आहेत. आतांवर परागचे पांच अंक निघाले. पाक्षिक बालवाचकांकरितां आहे. त्यामुळें नवलकथा, चुटके, माहितीचीं सदरें, लेख वगैरे त्यांत आहेत. पहिल्या अंकापेक्षां दुसऱ्या अंकाचें रूप नीटस आणि आकर्षक आहे. बालकांचें मन आणि त्यांच्या आवडीनिवडी ध्यानांत घेऊन परागमध्यें उत्तरोत्तर सुधारणा होईल आणि बालवाचकांना त्याविषयीं आपलेपणा वाटेल अशी आशा बाळगायला हरकत नाही. परागनें शाद्बिक कोटयांवर मात्र विनोदाकरितां विसंबून राहूं नये. आणि बालवाचकांकरितां कथा म्हणजे परीकथा अशी कल्पना मनाशीं बाळगूं नये अशी स्नेहाची सूचना आहे.

— गो. रा. दोडके

सितारा मंझिल

(ले. ना. सी. फडके; प्रकाशक अंजलि प्रकाशन लिमिटेड, मुंबई, पृष्ठें २५४; किं. ४ रु.)

हैद्राबाद पोलीस ॲक्शनच्या पार्श्वभूमीवरील श्री. फडके यांची ही ३१ वी कादंबरी आहे. महत्वाच्या प्रासंगिक घटनांबाबत साहित्यिकांनी जागरूक राहून त्यासंबंधीची आपली धारणा टिपून आपल्या वाङ्मयांत प्रतिबिंबित करावी असा एक संकेत आहे,असें म्हणतात. श्री. फडके हे या दृष्टीनें एक जागरूक कादंबरीकार आहेत. मुंबईतील एका मोठया संपाच्या वेळीं जमाव आंदोलनाचें प्रचंड दृश्य प्रत्यक्ष पहावयास ते अगत्यानें गेले होते, अशी एक आठवण त्यांनी स्वतःच नमूद केली आहे. हे सावध पण त्रयस्थ निरीक्षण हें या ललित लेखकाचें आवश्यक लेखनसाधन आहे. आणि त्याच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीने फडक्यांनी प्रस्तुत कादंबरीचा विषय उचलला आहे व त्यावरील ही कादंबरी आहे. तीस कादंबऱ्या लिहिल्यानंतर ३१ व्या कादंबरींत फडक्यांचा वाङ्मयीन पिंड कोणता, हें पुन्हा आवर्जून सांगण्याची गरज नाही राजकारणांत तो रमत नाही हें पुन्हा सिद्ध झालें आहे. कादंबरीलेखनासाठी मानवी जीवनाचा त्यांनी सोयिस्कर संक्षेप करून ठेवला आहे. कादंबरीच्या साचेबंद योजनेला सोयिस्कर असे स्वभावांच्या छाया–प्रकाशाचे परिणामकारक खेळ दाखविण्यासाठी त्यांची पात्रयोजना असते. त्याप्रमाणे हैद्राबादी राजवटींतील हुकुमशाहीचे प्रतिनिधी, त्या हुकुमशाहींत लाचार झालेल्या स्वजनद्रोह्यांचे प्रतिनिधि, उच्च (आंग्ल शिक्षण) शिक्षणाने व स्त्रीसुलभ कोमलतेनें, जातीय सूडबुद्धीशी सहमत न होणाऱ्यांचे प्रतिनिधी, देशभक्त, बलात्कारित व पीडित जनतेच्या सूडभावनेचे प्रतिनिधि अशा ठोकताळ्यांना अनुरूप अशी त्यांची जाफर जंग, बहादर प्रशाद, हुसेन, व जुलिया, अनंत, मल्लिका इत्यादि कादंबरीतील पात्रें आहेत, हा आराखडा ठरला, कीं हिंदी चित्रपटनिर्मात्यांच्या बाजारभावांच्या हिशेबाने फडक्यांची कादंबरीची रंगभरणी होणार. या ३१ व्या कादंबरींत कांही नाविन्य नाही; पण फडक्यांच्या कादंबऱ्यांच्या मापानें मोजण्यासारखें मानवी जीवन साचेबंद नाही. त्यांतील सूक्ष्म भेदाभेद अलिकडे केवळ तमासगिरी करणाऱ्या लेखकांच्या नजरेंत भरण्यासारखे नाहीत. उद्धार, दौलत सारख्या श्रेष्ठ कादंबऱ्या लिहिणाऱ्या लेखकाची जीवनानुभूति व धंदेवाईक प्रकाशनासाठी वार्षिक पाळीच्या रूपाने निर्माण होत असलेल्या नंतरच्या कादंबऱ्यांतील जीवन यांत फार फरक आहे. उद्धार व दौलत यांतील फडक्यांची अनुभूति जिवंत होती. हैद्राबादी राजवटींत राहणाऱ्या व्यक्तींच्या मुखांतून अवाङ्मयीन स्वरूपांत जीवनाचे जे रसरशीत अनुभव ऐकता येतात, त्या तुलनेने ही कादंबरी रसहीन आहे. पूर्व पुण्याईच्या बळावर या कादंबऱ्या लोकांनी वाचायच्या. पण तें कांही खरें नव्हे. ज्या कादंबऱ्यांसाठी महाराष्ट्र फडक्यांना डोक्यावर घेऊन नाचला, ते फडके संपले, हे अलिकडे या आणखी एका कादंबरीने पुन्हा एकवार सिद्ध केलें.

— केशव केळकर

विदर्भ साहित्य संघ, प्रकाशन नागपूर

[मध्यप्रदेश सरकारचे मुख्य मंत्री माननीय पंडित रविशंकर शुक्ल यांनी पुरस्कृत केलेलें आणि मराठी भाषा शिकूं इच्छिणाऱ्या हिंदी भाषीयांसाठी अत्यंत उपयुक्त असलेलें पुस्तक]

हिंदी–मराठी भाषा प्रवेशिका

लेखिका : मालतीबाई श्रीखंडे, एम्. ए., बी. टी. किंमत : सव्वा रुपया

एकमेव विक्रेते : कर्मवीर बुकडेपो, महाल, नागपूर २

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार : ३

फ्रेंच साहित्यकार आन्द्रे मॉल्रॉ

टीप– पाश्चात्य साहित्य आणि साहित्यकार या लेखमालेंतील तिसरें पुष्प या अंकांत आम्हीं सादर करीत आहोंत. इग्नेसिओ सिलोने आल्बर्ट श्वाईट्झर यांचा परिचय मागें करून दिलेला आहे. आज सुविख्यात फ्रेंच वाङ्मयकार आन्द्रे मॉल्रॉ यांचा संक्षिप्त परिचय प्रसिद्ध करीत आहों. यापुढें इटालियन विनोदकार ग्वारेशी, यांचा परिचय यथावकाश प्रसिद्ध होईल तसेंच पाश्चात्य वाङ्मयविवेचनांतील कांहीं वादस्थलांसंबंधांचे लेख प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. 'युगवाणी' च्या रसिक वाचकांनी पाश्चात्य वाङ्मयासंबंधीं लेख पाठविल्यास त्यांना जरूर स्थान मिळेल.

–संपादक

आजच्या फ्रेंच साहित्यकारांमध्ये आंद्रे मॉल्रॉ यांना मोठें मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. जिआँ पॉल सार्त्र व कॅमस यांच्या बरोबरीनेच मॉल्रांचा उल्लेख होत असतो; कारण या तीन विचारवंतांच्या साहित्याचा फ्रान्सच्या वैचारिक व सांस्कृतिक जीवनावर फार प्रभाव पडलेला आहे. कोणच्याही काळांतील विचारांचें दर्शन त्यांतील साहित्यांत प्रकट होतें. साहित्यकार हा अत्यंत संवेदनाशील असल्यामुळें त्याच्या भावसृष्टींत चालूं काळाचें यथार्थ दर्शन घडते व त्याच्या अनुभूतीचें सामर्थ्य प्रगट होऊन चालूं काळांतील जाणीवांचे निदर्शन होते. मॉल्रॉ हा एक अत्यंत प्रभावी वाणीचा चिंतनशील लेखक आहे. तत्वज्ञान, राजकारण, समाजशास्त्र या विषयांचा प्रसक्त व्यासंग करून त्याने आपल्या लेखनास सुरवात केली. स्वत: त्याने फ्रान्सच्या सामाजिक व राजकीय चळवळींत भाग घेतलेला आहे. सध्या मात्र तो आपल्या साहित्यांतून आपल्या विचारांचा प्रचार करण्यांत गुंतला आहे.

मॉल्रॉचें राजकीय जीवन संक्षिप्त स्वरुपांत सांगावयाचें म्हणजे त्याने १९२५ सालीं चीनमधील कम्युनिस्ट चळवळींत भाग घेतला होता. तसेंच स्पेनच्या यादवींतही त्याने भाग घेतला. हिटलरच्या आक्रमणानंतर गुप्त चळवळींत भाग घेऊन तो पुढें डी गॉल्चा प्रवक्ता बनला (अर्थात् हें त्याच्या त्यावेळच्या साम्यवादी मतांशीं जुळणारें नव्हतें). तो केवळ चिंतन करणारा निष्क्रिय साहित्यकार नाही तर एक विचारांप्रमाणे कृति करणारा पुरुषार्थी साहित्यकार आहे. स्वत:च्या मतांप्रमाणे कर्मयोग आचरणारा तो झुंजार लेखक आहे. आजच्या फ्रेंच साहित्यकारांमध्ये मॉल्रॉइतका जीवनानुभव वेंचलेला दुसरा साहित्यकार नाही. सार्त्र व कॅमस यांच्या जीवनांत मॉल्रॉच्या आयुष्याप्रमाणे राजकीय उत्पाती चळवळी नाहीत. सार्त्र हा बुद्धिवाद्यांचा अग्रणी असून तत्वज्ञ, नाटककार, पत्रकार, राजकारणी व समाजशास्त्री म्हणून ख्यात आहे, तर कॅमस हा तत्वज्ञ आणि राज्यशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. मॉल्रॉच्या विचारांना संपन्न अनुभवांचा आधार आहे आणि म्हणून त्याचे विचार अभ्यसनीय आहेत. मॉल्राचे अनेक विचार सर्वसंमत होणार नाहीत. कांहींना तर मॉल्रॉचीं मतें उद्वेगजनक वाटतील परंतु त्या विचारांचा जनक एक अत्यंत बुद्धिमान् प्रतिभावंत, असामान्य सामर्थ्याचा साहित्यकार आहे हें लक्षांत ठेऊनच त्यांचा सखोल विचार करणें इष्ट आहे.

त्याच्या लेखनांत त्याच्या गूढ व्यक्तिमत्वाचें अस्पष्ट दर्शन होतें. पण आजच्या जगांतील घटनांचें अगर विचारप्रणालीचें मात्र स्पष्ट दर्शन घडतें. त्याच्या साऱ्या ललितकृतींतून प्रौढ तात्विक विचार, संवेदनाशील मनाचा व उत्कट भावनांचा आविष्कार, मानवजातीबद्दलची गंभीर चिंता, सिसृक्षेची वृत्ति यांचा मनोहर संगम आढळतो. मॉल्रॉची प्रत्येक कृति म्हणजे तात्विक विचारांचे उद्रेक.

"What weighs upon me, is my

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

humanity" असें मॉल्‌रॉचें एक पात्र म्हणतें. या एका वाक्यावरून मॉल्‌रॉच्या लेखनाचें स्वरूप लक्षांत येईल. 'Humanity' या एकाच विषयावर मॉल्‌रॉनें लिहिलेलें आहे. हिंसा आणि क्रांति यांनी पूर्ण असलेल्या अलिकडच्या काळाला पार्श्वभूमि कल्पून मॉल्‌रॉनें आपल्या कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. आजच्या जगांतील राजकीय संघर्ष आणि त्यांत सांपडलेलीं माणसें त्याच्या कादंबऱ्यांतील पात्रें आणि घटना होत. The Conquerors, Days of Wrath, La Condition Humaine, Les Novers d' Altenburg Voices of Silence या त्याच्या साहित्य कृतींतून मानवजातीबद्दलचे विचार, पराकाष्टेची चिंता, व भवितव्याची कल्पना प्रगट झालेलीं आहेत. It is difficult to be a man हें त्याचें विचित्र विधान त्याच्या विचारांचें सूत्र आहे. त्याचे नायक साम्यवादी क्रांतिकारक आहेत. पण अंधश्रद्ध नाहीत. ते राजकारणांत भाग घेतात पण त्यांचें व्यक्तिमत्व पक्षाच्या कार्यांत विलीन होत नाही तर तें वैशिष्टचपूर्ण असेंच दाखविलेलें आहे. मॉल्‌रॉ हा केवळ यथार्थदर्शी ललितलेखक नाही.तो तत्वचिंतक प्रथम आहे आणि म्हणून त्याची पात्रें प्रकट तत्वचिंतन (Loud thinking) करतांना दिसतात. मॉल्‌रॉला 'क्रांतिकार्यांत' मानवाचें खरें दुःख कळलें नाही. मानवाचें अपार धैर्य आणि तसेंच दुःख त्याला तत्वचिंतनांत, आत्मनिरीक्षणांत व आत्मप्रत्ययांत आढळलें. क्रांतिकार्य सोडून मॉल्‌रॉ आता कलेच्या सर्जनांत व तिची भक्ति करण्यांत गुंग झालेला आहे. कलेसंबंधी तो भक्तीच्या भावनेनें बोलूं लागला आहे. त्याला त्याचे 'सत्य' गवसलें आहे.

The Voice of Silence हा मॉल्‌रॉचा अगदी अलिकडे प्रसिद्ध झालेला ग्रंथ आहे. त्यांत त्याने कलेच्या सर्जनामागील मनाचें विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याच्या 'कलेचें मानसशास्त्र' (Psychology of Art) या जुन्याच ग्रंथाची ही नवीन विचारांनी परिपूर्ण केलेली आवृत्ति आहे. सध्या फ्रेंच वाङ्मयांत ल मोनोलोग् द् ॲन्तिरिओ या मानसशास्त्रीय तंत्राचा बराच वापर झालेला दिसतो एलिअट्‌ने व जॉयस्‌नें आधुनिक मनाचा गोंधळ, विसंवाद, अगतिकता दर्शविण्यासाठी ही अंतर्मनाच्या 'उद्‌गारां'ची तंत्रपद्धति सुरू केली. तिचा उत्कृष्ट आविष्कार फ्रेंच वाङ्मयांत झालेला आहे. अंतर्मनांत दडलेले विचार जसे विसंगतपणें उद्‌भवतात तसें प्रकट करणें या पद्धतीलाच Interior Monologue हें नांव आहे Interior Monologue ला कॅमस व मॉल्‌रॉ यांनी वाङ्मयविवेचनांत महत्वाचें स्थान दिलेलें आहे. मॉल्‌रॉनें आपलें कलाविषयक 'विचार' या ग्रंथांत मांडलेले आहेत. कला म्हणजे काय ? तिचें गतेतिहासाशी, वर्तमानकालाशी,समाजाशी व मानवाच्या नियतीशीं काय नातें आहे ? कलेच्या निर्माणामागें व सिसृक्षेच्या वृत्तीमागें काय तत्वज्ञान आहे ? सृजनशील कलेच्या निर्मितींत 'मना'चें काय कार्य आहे इत्यादि प्रश्न कलेच्या मानसशास्त्रांत उपस्थित होतात. उदाहरणच घेऊन सांगावयाचें म्हणजे असें. कांही रसिक मंडळी अमीरखाँसारख्या गायकाचा दरबारी कानडा ऐकतांना अगर रसूलनबाईची झिंजोटी ऐकतांना देहभान विसरतात. कांही अंजठा–वेरूळचीं लेणीं पाहतांना अगर निरनिराळ्या कालांतील शिल्पकृतींचा अभ्यास करण्यांत मग्न असतात. कांहीजण पिकॅसोच्या गुंतागुंतीच्या चित्रांचा अर्थ लावण्यांत गुंग असतात तर कांही सेझाँच्या फळांच्या आकृति पहाण्यांत तन्मय होऊन जातात. एखाद्याला काव्याचें इतकें अनिवार वेड असते की, एलिअट्‌चें समग्र काव्य वाचण्यांत तो तल्लीन होऊन जातो तर एखाद्याला निसर्ग सौंदर्याची चित्रें पाहण्यांत धन्य वाटतें. या सर्व सृजनशील कलांच्या मागें एखादें तत्व आहे काय याचा सर्वच कलाभिज्ञांना प्रश्न पडलेला आहे. मॉल्‌रॉनें कलेचें मर्म सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याची मतें सर्वस्वी ग्राह्य वाटणार नाहीत व कांही जणांना ती सुसंगतही भासणार नाहीत. परंतु एक विचारवंत तत्वज्ञानें काढलेले निष्कर्ष म्हणून तीं मतें अभ्यसनीय खासच आहेत. चिंतनशील वृत्तीनें आणि कळकळीने त्यानें आपले विचार मांडलेले आहेत. खरें पाहिलें असतां विविध कलांमागील 'तत्व' शोधून काढणें कठीण आहे. संगीत, नृत्य, शिल्प, स्थापत्य, चित्र, आणि ललितवाङ्मय यांच्यामधून एक सुसंगत संवादी तत्वज्ञान शोधून काढणें अलौकिक प्रतिभाशक्तीचें काम होय. मॉल्‌रॉचा कलेचा अभ्यास दांडगा आहे. सुमेरियन शिल्पकलेपासून तो पिकसोच्या चित्रकलेपर्यंत सर्व कलांचा परिचय त्यानें करून घेतलेला आहे. त्याच्या मर्मज्ञ बुद्धीनें कलेचें मर्म शोधण्यासाठी तत्वज्ञान, मानसशास्त्र समाजशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मॉल्‌रांच्या मतें कला म्हणजे केवळ जीवनांतील उत्कट अनुभूतींचें चित्रण अगर कल्पनाशक्तीच्या साहाय्याने त्या अनुभूतींचा पुनःप्रत्यय घेण्यासाठी, केलेले प्रकटीकरण नाही तर मानवाने नियतीविरुद्ध केलेला झगडा आणि नियतीच्या कठोर आघातापासून संरक्षण म्हणजे त्याची कला होय. अंतर्मनाशी अगर आंतल्या आवाजाशी संवाद व प्रतिसाद म्हणजेच कला होय. मॉल्‌रॉने Fnm व Styu यासंबंधी विस्ताराने विवेचन केलेलें आहे. (मॉल्‌रॉचीं कांही मतें विवादास्पद आहेत) कलावंताला आलेली अनुभूति तो कलेच्या साहाय्यानें संक्रांत करत असतो व संक्रमण (Communication) हेंच कलेचें मुख्य कार्य आहे. स्वानुभूत भावभावना कलेचें वाहन करून त्यांचा इतरांना प्रत्यय घडविणें हेंच कलावंताचें कार्य आहे. त्याने निवडलेली रीति (Stgu) अगर Form (रूप) हीं गौण होत. कलावंताचें आत्मीय जग व बाह्य जग यांचा संवाद म्हणजेच कला. दृश्य आणि श्राव्य अनुभूतींचा कलावंताच्या मनाशी झालेला मेळ अगर कलावंताच्या मनाने केलेली अनुभूतींची मीमांसा म्हणजेच कला. मॉल्‌रॉने संक्रमण (Communication) ला फारसें महत्व दिलेलें नाही ही त्याच्या विचारांतील मोठीच उणीव आहे.

पूर्वीच्या कलेंत साध्य साधनांची संगति होती. लेणीं कोरणाऱ्या बुद्ध भिक्षूंना काय दाखवावयाचें आहे याची पूर्ण कल्पना असे. आजच्या किती कलावंतांना आपल्या कलेचें ध्येय सांगतां येईल ? असा प्रश्न मॉलराने एका ठिकाणीं विचारलेला आहे. परंतु पुढे कलावंताच्या आत्मीय विश्वासंबंधी लिहितांना तो म्हणतो कीं, कलेचें सर्वस्व कलावंताच्या आत्मीय जगाचें प्रकटीकरण करण्यांत आहे. येथेच त्यांच्या विचारांत विसंगति निर्माण होते.

आधुनिक कलेसंबंधीचे मॉलराचे विचार मननीय आहेत. What the logic art of modern times is trying to do away with is times is trying to do away with, is the gag of lies with wich civilisation stifles the the voice of destiny ' हे त्यांचे उद्गार विचारांना चालना देणारे आहेत. आजची पिकॅसोची चित्रकला मानवाची आजची करुण अवस्था उत्कृष्टपणे दिग्दर्शित करते. परंतु इतर कलावंतांच्या कलेंत आत्म्याचे उद्गार आढळत नाहीत. आत्मानंदांत त्याची कला विहार करते; पण त्याची अनुभूति सखोल नसते व त्यांच्या भावना संक्रांत होत नाहीत. कला जेव्हा आत्मप्रत्ययांतून निर्माण होईल तेव्हाच ती धर्माचें स्थान पटकावूं शकेल. मॉल्‌राच्या ग्रंथाचें नांव अनाहत नाद (Voices of Silence) फार मार्मिक असून त्यांतील Human Destiny आणि Tragic Element यांचें विवेचन फारच मार्मिक आहे. ही ओळख व्हावी येवढाच या संक्षिप्त लेखाचा हेतु आहे. ' युगवाणी'च्या एखाद्या तत्वजिज्ञासु वाचकाने मॉल्‌राच्या प्रबंधाचें सविस्तर परीक्षण केल्यास प्रस्तुत लेखक व युगवाणीचे रसिक वाचक त्याचे फार आभारी होतील.

Un Liseur

लेखकांस सूचना

१ लेख अगर कविता कागदाच्या एका बाजूने सुवाच्य अक्षरांत लिहिलेली असावी.

२ हस्तलिखिता समवेत पुरेसें टपाल हशिल पाठवावें.

३ संपादकीय निर्णयासंबंधीं पत्र व्यवहार केला जाणार नाही

४. अस्वीकृत, पण टपालखर्च नसलेलें लिखाण एक महिन्याच्या आंत निकालांत काढलें जाईल.

संपादक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

ना. रा. शेंडे
सरचिटणीस, वि. सा. संघ,
यांजकडून.

कार्यकारी मंडळाची सभा

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. १८ – ७ – १९५४ रोजीं सकाळीं ९ वा. संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखाली केन्द्रीय कार्यालयांत भरली. सभेंत खालील कामकाज झालें :

१. प्रथम सरचिटणिसांनी दि. २४–४–५४ रोजीं भरलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो मंजूर झाला.

नंतर, सरचिटणिसांनी एप्रिल ते जून ५४ पर्यंतच्या काळांत झालेल्या कामकाजाचा आढावा सभेला सादर केला. त्यांत त्यांनी, (अ) वि. सा. मंदिराच्या उद्घाटनासाठी झालेला खर्च, (आ) कर्मचारी वर्ग व कार्यालयीन व्यवस्था, (इ) 'नागपूर नाटच मंडळ' वि. सा. संघाची संलग्न संस्था झाली असून, या संलग्न संस्थेला दिल्ली नाटच संघ, नॅशनल ड्रामा फेस्टिवल कमिटीच्या वतीनें होणाऱ्या नाटच महोत्सवांत भाग घेण्यास मान्यता देण्यांत आली व दिल्ली नाटच संघाला, तशी शिफारस करण्यांत आली त्याची माहिती, (ई) सौ. कुसुम मोहनी यांची इन्फर्मेशन अँण्ड ब्रॉडकास्टिंग विभागातर्फे सुरू झालेल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रसिद्धीसाठी होणाऱ्या नाटच प्रयोगास्तव सहकार्य देण्यास, वि. सा. संघाच्या प्रतिनिधि म्हणून नियुक्ति, (उ) दि. २४–५–५४ व दि. १२–६–५४ रोजीं कार्यकारी मंडळाच्या नागपुरांतील सदस्यांच्या घेण्यांत आलेल्या अनौपचारिक बैठकींचें वृत्त, (ऊ) वि. सा. संघाच्या 'अस्थायी नाटच समिती'ची नियुक्ति (ए) हायकोर्टात पेश करण्यांत आलेल्या मॅन्डमस् अर्जासंबंधी माहिती इ० बाबींचा उल्लेख केला.

तसेंच, १ एप्रिल ते ३० जून १९५४ पर्यंतच्या जमा – खर्चाचा तक्ताहि सरचिटणिसांनी सभेला सादर केला.

२. नंतर, कार्यकारी मंडळांतील एका सदस्याची रिकामी झालेली जागा भरून काढण्याचा प्रश्न सभेपुढे आला. श्री. द. रा. गोमकाळे यांनी 'निवडणुकींत उभे असलेल्या उमेदवारांपैकी यशस्वी उमेदवारानंतर, अनुक्रमानें ज्याचा प्रथम नंबर लागत असेल त्याला कार्यकारी मंडळावर घ्यावे' असा ठराव मांडला. त्यास श्री. पां. वा. गडकरी यांनी दुजोरा दिला. श्री. पु. य. देशपांडे यांनी नांवें सुचवितां येतात, नियम करतां येत नाही अर्थात् श्री. गोमकाळे यांचा ठराव नियमबाह्य आहे असा हरकतीचा मुद्दा (Point of order) उपस्थित केला. आणि घटना नियम १४ (इ) प्रमाणे कार्यकारी मंडळानेंच सदस्याची नियुक्ति करावी व शक्यतोंवर ज्या विभागांतील सदस्यानें राजीनामा दिला आहे त्या विभागांतीलच सभासद कार्यकारी मंडळावर असावा, असें सुचविलें. तर श्री. पां. वा. गडकरी यांनी श्री. पु. य. देशपांडे यांनी उपस्थित केलेला हरकतीचा मुद्दा नियम १४ (इ) प्रमाणे होऊं शकत नाही, असें सांगितलें. या प्रश्नावर साधकबाधक चर्चा झाल्यावर, श्री. व. बा. शद्धे यांनी सांगितलें की श्री. गोमकाळे यांच्या सूचनेंप्रमाणे निवड केली तर तो नियम नेहमीसाठी कार्यकारी मंडळाला बंधनकारक होईल तेव्हां कार्यकारी मंडळानें आपल्या सोयीनुसार सभासदाची निवड करावी, या पद्धतीची निवड या वर्षापुरतीच राहील असें ठरवावें. प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी श्री. शद्धे यांच्या सूचनेला पाठिंबा दिला. तसेंच श्री. पु. य देशपांडे यांनी अशी मर्यादा असल्यास आपली हरकत नाही असें मत दिलें. शेवटीं, 'यंदाची कार्यकारी मंडळांत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रिकमी झालेली सभासदाची जागा ठरावांत सुचविलेल्या पद्धतीप्रमाणे भरून काढावी. ती या वर्षाकरिताच लागू होईल. पुढे ती कोणत्याहि प्रकारें 'बंधनकारक रहाणार नाही' असें ठरून, या सूचनेसह श्री. गोमकाळे यांचा ठराव अध्यक्षांनी मताला टाकला व तो ठराव बहुमताने नामंजूर झाला. नंतर अध्यक्षांनी या जागेसाठी नांवें सुचविण्यास विनंती केली.

प्रा. भ. श्री. पंडित यांनी प्रा. मा. ल. व्यवहारे यांचें नांव सुचविलें. त्यास श्री. तु. ना. काटकर यांनी अनुमोदन दिलें. श्री. व. वा. शद्वे यांनी श्री. ना. ग. डबीर यांचें नांव सुचविलें. त्यास प्रा. श्री. ना. बनहट्टी यांनी अनुमोदन दिलें. श्री. पां. बा. गडकरी यांनी डॉ. मा. गो. देशमुख यांचें नांव सुचविलें. त्यास श्री. द. रा. गोमकाळे यांनी अनुमोदन दिलें. थोडयाशा चर्चेनंतर, गोंदिया शाखेच्या कार्याच्या दृष्टीने विचार करण्यांत येऊन, सुचविलेलीं तीनहि नांवें एकमताने परत घेण्यांत आलीं आणि "प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांच्या राजीनाम्यामुळे रिकाम्या झालेल्या जागीं गोंदियाशाखेच्या अध्यक्षांच्या शिफारशीनुसार, गोंदियाच्या सभासदाला कार्यकारी मंडळावर नियुक्त करण्याचा अधिकार संघाध्यक्षांना देण्यांत यावा" असा एकमताने निर्णय घेण्यांत आला.

३. नंतर, मंदिररचना समिति, मंदिरनिधि समिति व गडकरी स्मारक समिति यांच्या नियुक्तीचा प्रश्न सभेपुढें आला. मंदिराचें पुढील बरेंच कामकाज उरलें असल्याने, मागील वर्षाप्रमाणेच या समित्या आहेत तशाच कायम रहाव्यात; त्यांत सोयीप्रमाणे थोडाफार फेरफार करावयाचा झाल्यास तसा अधिकार त्या त्या समितीच्या अध्यक्षांना व आमंत्रकांना राहील, असें ठरविण्यांत आलें. रंगमंदिरासंबंधीचा विचार अर्थात्‌च त्या संबधित समिति करील, असें मत व्यक्त करण्यांत आलें.

४. दि. १२. ६. ५४ रोजीं कार्यकारी मंडळाच्या नागपुरांतील सदस्यांची जी अनौपचारिक सभा भरून एक अस्थायी नाट्य समिति नियुक्त करण्यांत आली, तीस 'स्थायी समिति' म्हणून मान्यता देण्यांत आली. ही 'नाट्य समिति' खालीलप्रमाणे :

सभासद—प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. नानासाहेब जोग, श्री. केशव केळकर, श्री. पां. बा. गडकरी, श्री. द. रा. गोमकाळे, श्री. सखारामपंत जोशी, श्री. श्री. रा. पु. सगदेव, श्री. बाबूराव चिमोटे, प्रा. के. ज. पुरोहित, श्री. य. शं. धर्माधिकारी.

चिटणीस—सौ. कुसुम मोहनी व आमंत्रक—श्री. ल. वि. पांढरीपांडे.

५. त्या नंतर, १९५४–५५ सालच्या निवडणुकीसंबंधी पेश करण्यांत आलेल्या मॅन्डमस् अर्जाबाबत अध्यक्षांनी व सरचिटणिसांनी निवेदन केलें.

६.ग्रंथालय समितीने ग्रंथालयासंबंधी तयार केलेली योजना सभेला सादर करण्यांत आली. या योजने-बाबत अध्यक्षांनी व प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडें यांनी निवेदन केलें.

७. भाषाविषयक संशोधनासंबंधी शिष्यवृत्ति देण्याचा प्रश्न विचारांत घेण्यांत आला. याबाबत अध्यक्षांनी माहिती दिली. हा प्रश्न भाषाविषयक संशोधन समितीने प्रथम विचारांत घ्यावा व मग त्यावर कार्यकारी मंडळाने काय तें ठरवावें, असें ठरलें.

८. घटनाविषयक प्रश्नासाठी सल्लागारांच्या नियुक्तीची आवश्यकता नसल्याचा निर्णय घेण्यांत आला.

९. श्री गं. ग. जांभेकर यांनी कै. बाळशास्त्री जांभेकर यांची पुण्यतिथि साजरी करण्यासंबंधी देणगीबद्दल जें पत्र पाठविलें तें विचारांत घेण्यांत येऊन, ही देणगी बंधनकारक असल्याने, ती स्वीकृत करतां येत नसल्याचा निर्णय घेण्यांत आला.

१०. अध्यक्षांच्या परवानगीने, श्री. तु. ना. काटकर यांनी, चंद्रपूर शाखेला 'वि. सा. संघ गोंडवन शाखा, चंद्रपूर' म्हणून नांव देण्याचा ठराव केन्द्रीय कार्यालयाकडे पाठविणार असून, त्यास मान्यता देण्यत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावी, अशी विनंती केली. तसा ठराव आल्यास त्याला मान्यता देण्यास कार्यकारी मंडळाची हरकत नसल्याचा निर्णय घेण्यांत आला.

* *

वि. सा. संघाला उदार देणग्या व भेटी

–डॉ. नारायण वामन मोडक, पुणे यांनी वि. सा. संघाला एक सुंदर इन्सायक्लोपिडिया–केस देणगी म्हणून दिली.

–श्री. श्री. एम्. ब्रम्हराक्षस यांनी वि. सा. संघाला इन्सायक्लोपिडिया ब्रिटानिकाचे ३५ खंड देणगी म्हणून दिले.

–प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे यांनी कै. बाळशास्त्री जांभेकर यांच्या चरित्राचे ३ खंड वि. सा. संघाला भेट म्हणून दिले.

–श्री. प्रभाकर माचवे यांनी विविध अशीं १५८ पुस्तकें आणि १५६ किरकोळ मासिकें वि. सा. संघाच्या पुस्तकालयास भेट म्हणून दिलीं.

वि. सा. संघ उपरिनिर्दिष्ट दात्यांचा फार आभारी आहे.

* *

श्री. प्रभाकर माचवे यांचा सत्कार

मध्यवर्ति सरकारच्या साहित्य अकादेमीचे सहचिटणीस म्हणून नियुक्त झालेले मराठी–हिंदीचे प्रसिद्ध साहित्यिक श्री. प्रभाकर माचवे यांचा शुक्रवार दि. ९–७–५४ रोजीं वि. सा. संघातर्फे संघाध्यक्ष श्री. ह. ना. नेने यांचे अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. वा. कृ. चोरघडे व प्रा. श्री.भा.वर्णेकर यांचीं त्यांच्या साहित्यिक बहुगुणांची प्रशंसा करणारीं भाषणें झालीं.उत्तरादाखल भाषण देतांना साहित्य अकादेमीच्या राष्ट्रव्यापि कार्याची रूपरेषा स्पष्ट करून, श्री. माचवे यांनी 'या अकादेमीतर्फे एक त्रैमासिक निघून त्यांत सर्व भारतांतील साहित्यिकांचा व साहित्याचा परिचय करून देण्यांत येईल. या अकादेमी द्वारें राष्ट्रीय प्रमाणावर योजनाबद्ध असें भरीव काम करण्यांत येईल' अशा आशयाचें उद्बोधक व विचारप्रेरक भाषण दिलें आणि 'आणि आज तरी हें एक भव्य स्वप्न आहे, तें साकार होवो' अशी सद्भावना प्रगट केली.

*

भंडारा शाखेतर्फे श्री. माचवे यांचा सन्मान

रविवार दि. ११. ७. ५४ रोजीं भंडारा येथे, तेथील वि. सा. संघशाखा, गोंदियाशाखा व सार्वजनिक वाचनालय या संस्थांतर्फे श्री. प्रभाकर माचवे यांचा सन्मान करण्यांत आला. भंडाराशाखेचे चिटणीस श्री. वसंतराव शद्वे, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष श्री. दलाल व कार्यवाह श्री. अनंतराव साठे प्रभृतींनी श्री. माचवे याचें हार्दिक स्वागत केलें. श्री. शद्वे यांनी गौरवपर प्रास्ताविक भाषण केल्यावर, श्री. माचवे यांचें मार्मिक शब्दांत प्रभावी भाषण झालें. त्यांनी आपल्या भाषणांत, उच्च अभिरुचिसंपन्न वाङ्मय निर्मितीवर भर दिला आणि शेजारच्या इतर भाषेशीं व बोलीशीं अपरिचित न राहतां, परस्पर हितसंबंध निगडित होतील असें वाङ्मयीन कार्य घडवून आणावें, असें मत व्यक्त केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रा. बनहट्टी-ग्रंथप्रकाशन मंडळाची विनंती

गुरुवर्य श्री. ना. बनहट्टी यांच्या निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचे संपादन करून ते ग्रंथरूपानें खंडशः प्रकाशित करण्याचे योजिले आहे.

प्रा. बनहट्टी यांचा गेल्या पंचवीस वर्षांतील अध्यापन, साहित्यविवेचन व नाट्यविषयक व्यासंग इतका सर्वश्रुत आहे, की त्यांचे विविध लेख संग्रहीत केल्यास मराठीत टीकात्मक ग्रंथांची मूल्यवान भर पडेल याविषयी दुमत होणार नाही. त्यांच्या निवडक नाट्यविषयक लेखांचा संग्रह जुळविण्याचे काम सुरू झाले असून, महाराष्ट्रभर विखुरलेल्या त्यांच्या विद्यार्थ्यांना व असंख्य चाहत्यांना अशी विनंती आहे, की या संग्रहांबाबत त्यांना करावयाच्या सूचना त्यांनी येत्या ३१ ऑगष्टपर्यन्त आमच्याकडे पाठविण्याची कृपा करावी.

त्रिं. गो. देशमुख

संपादक मंडळ

डॉ. वि. भि. कोलते, नागपूर
डॉ. मा. गो. देशमुख, ,,
प्रा. वा. कृ. चोरघडे, ,,
प्रा. द. रा. गोमकाळे, खामगाव
ना. वसंतराव नाईक, उपमंत्री, नागपूर
खासदार भाऊराव बोरकर ,,
प्रा. सौ. इंदुमती देशमुख, अमरावती
प्रा. दा. ल. अडोणी, सागर
श्री. राजा बढे, मुंबई

पत्रव्यवहाराचा पत्ता–
कार्यवाह, श्री. बनहट्टी–ग्रंथप्रकाशन मंडळ
मराठी जग कार्यालय, सुभाष मार्ग, नागपूर २.

काळजी दप्तरी स्मृति संदर्भ ग्रंथालय विदर्भ साहित्य संघ, नागपूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचे उद्देश आणि गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराची इमारत पूर्ण करणें व नाटचगृह बांधणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र युगवाणी आर्थिक दृष्टीने स्वावलंवी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने दुर्मिळ ऐतिहासिक, शैक्षणिक व वाङ्मयीन ग्रंथांचें प्रकाशन.

५. मराठी भाषेच्या हिताचें प्रतिनिधिक स्वरूपाचें कार्य करणें,

मराठी–प्रेमी जनतेने तनमनधनाने विदर्भ साहित्य संघाला मदत करावी अशी नम्र विनंती आहे.

'युगवाणी' सदस्यांना विनामूल्य. ☆ सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

हें मासिक श्री. कुंडलराय मोहेकर यांनी अशोक मुद्रणालय, धर्मपेठ, नागपूर येथे मुद्रित केलें व श्री. ह. ना. नेने, अध्यक्ष, वि. सा. संघ, यांनी संघ–कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ